Lexicon Broadcasting LLP

# CiViC मिरर पुणे

Licensor : Bennett, Coleman & Company Ltd

गुरुवार, ११ मे २०२३ | हवामान : कमाल : ४०, किमान : २६ | पाने : १६ | स्वागत मूल्य : ३ रुपये | सोने : ६१,९४० | चांदी : ७८,००० | डॉलर : ८१.९४ | युरो : ९०.०१

civicmirror@civicmirror.in | facebook.com/civicmirrorpune | instagram.com/civicmirrorpune | twitter.com/civicmirrorpune

अंक बुकींगसाठी संपर्क : ९८८१६७२१२३

३

## डीटीडीसी कुरिअरमधून पुन्हा तलवार!

मणिपूर राज्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर आसामला जाणारे पार्सल दिघी पोलिसांकडून जप्त



५

## आयटी पार्कची कोंडी अखेर सुटली!

ऑटोमेटेड सिग्नल यंत्रणा आणि एकेरी वाहतुकीमुळे भूमकर चौकात वाहतूक सुरळीत



८-९

## मानसिक आजार, व्यसनातून सावरणारी 'मुक्ता'ई

मानसिक आजार आणि व्यसनांची लागण झालेल्या नागरिकांना 'मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशन' या ट्रस्टने नवे आयुष्य बहाल केले आहे.





छायाचित्र : तन्मय ठोंबरे

# वीस सेकंदात 'परवाना'ही

## वाहनाच्या पक्का परवाना कौशल्य चाचणीचा 'सूपरस्पीड' नागरिकांच्या जिवावर बेतणार; दुचाकीसाठी २० ते ६० सेकंद, तर कार, रिक्षासाठी फक्त एक मिनिटाचा कालावधी

विशाल शिर्के
vishal.shirke@civicmirror.in
TWEET@vishal_mirror

वाहन चालवण्याचे कौशल्य तपासण्यासाठी मोटर वाहन कायद्यानुसार तब्बल २४ निकषांची तपासणी करणे आवश्यक आहे. मात्र, या सर्व निकषांना वाचण्यासाठी जितका वेळ लागेल त्यापेक्षाही कमी कालावधीत शिकाऊ उमेदवार पक्क्या परवान्यासाठी चाचणी परीक्षा देत असल्याची धक्कादायक बाब समोर आले आहे. दुचाकीसाठी १६ ते वीस सेकंदात, तर कार आणि रिक्षासाठी सुमारे एक मिनिटाच्या आतच वाहनकौशल्य चाचणी पूर्ण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. 'सीविक मिररच्या' प्रतिनिधीने केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत ही बाब स्पष्ट झाली आहे.

वाहनाच्या नोंदणीपासून ते परवाना वितरित करण्या पर्यंतची विविध कामे प्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) केली जातात. वाहन परवाना मिळवण्यासाठी सुरुवातील शिकाऊ परवाना (लर्निंग लायसन्स) आणि नंतर पक्क्या परवान्यासाठी प्रत्यक्ष वाहन कौशल्य चाचणी घेतली जाते. भोसरीतील इन्स्टिट्यूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग रिसर्च (आयडीटीआर) या संस्थेतील 'ट्रॅक'वर कारचा वाहन परवाना प्रथमच घेत असल्यास कौशल्य चाचणी केली जाते. तर, आळंदी रस्त्यावरील फुलेनगर येथे दुचाकी, तीन चाकी आणि इतर जड वाहनांची कौशल्य चाचणी होते. एखाद्या व्यक्तीच्या कारच्या परवान्याची मुदत संपल्यानंतर पुन्हा परवाना मिळवण्यासाठीदेखील आळंदीतील 'ट्रॅक'वरच परत कौशल्य सिद्ध करावे लागते.

दुचाकी, कार या वाहनांचा पक्का परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) मिळवण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्य चाचणी अनुक्रमे १६ ते ६० सेकंदात पूर्ण केली जात आहे. 'सीविक मिररच्या' प्रतिनिधीने फुलेनगर येथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. त्यात दुचाकी चालकाची वाहन चाचणी केवळ आठ आकड्याच्या आकारातील ट्रॅक पार केल्यानंतर पूर्ण झाली. त्यासाठी अवघे २० सेकंद लागले. संबंधित वाहनचालकाला विचारल्यानंतर केवळ माझ्या रहिवासी पत्त्याची कागदपत्रे तपासली. नंतर आठच्या वळणदार आकड्याचा ट्रॅक पार करण्यास सांगितले. त्यानंतर माझी कौशल्य चाचणी पूर्ण झाली, असे त्याने सांगितले.

### ...म्हणूनच पुण्यात सरसकट परवाना

पुणे प्रादेशिक परिवहन विभागाकडे एक जानेवारी २०२२ ते २१ डिसेंबर २०२२ या कालावधीत २ लाख २७ हजार ८१८ जणांनी पक्क्या वाहन परवान्यासाठी अर्ज दिले. त्यातील ५६७ जण कौशल्य चाचणीसाठी अनुपस्थित राहिले. तर, २ लाख २७ हजार २५१ जणांना चाचणी परीक्षा दिली. त्यातील २ लाख २४ हजार ८८२ जण उत्तीर्ण झाले. तर, २ हजार ३६९ उमेदवार अनुत्तीर्ण झाले. काटेकोर तपासणी न केल्याने परवाना नाकारण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचा दावा वाहतूक अभ्यासकांकडून केला जात आहे.

मोटर वाहन कायद्यानुसार पक्का परवाना मिळवण्यासाठी २४ प्रकारच्या निकषांची तपासणी करणे आवश्यक आहे. त्यात अगदी वाहनाचा आरसा व्यवस्थित पाहिला जातो की नाही, वळणे कशी घेतली जातात, इंडिकेटर कसे दाखवितात, लेन कटिंग करत नाही ना, यू टर्न कसा घेतला जातो, वाहनाला रिव्हर्स गिअर असल्यास तो कशा पद्धतीने टाकला जातो, क्लच, गिअर, ब्रेकचा वापर कसा केला जातो, पादचारी आणि इतर वाहनचालक लक्षात घेऊन वाहन चालवता येते की, नाही अशा विविध बाबी पडताळणे आवश्यक आहे. मात्र, या निकषांची कोणतीही पडताळणी केली जात नसल्याचे दिसून येत आहे.

वाहतूक अभ्यासक के. डी. पवार म्हणाले, 'शहरासह राज्यात रस्ते अपघातात मृत्यू होण्याची संख्या लक्षणीय आहे. याला जबाबदार आपली प्रादेशिक परिवहन कार्यालये आहेत. तिथे वाहन कौशल्यांची योग्य तपासणीच केली जात नाही. असे अकुशल वाहनचालक रस्त्यावर आल्यास अपघात होतीलच. मोटर वाहन कायद्यानुसार किमान २४ निकषांची तपासणी वाहन कौशल्याची चाचणी घेताना करायला हवी. मात्र, चार प्रकारच्या निकषांचीदेखील तपासणी होत नाही. नवले पुलाजवळ गेल्या वर्षी ४८ वाहने एकमेकांना धडकली होती. त्यानंतर मी पक्का परवाना देताना वाहन कौशल्य चाचणी कशी घेतली जाते याची पाहणी केली. आरटीओच्या चाचणी मैदानावर जाऊन स्टॉप वॉचच्या साहाय्याने वेळेचीही तपासणी केली आहे. त्यात दुचाकीला १६ ते २२ सेकंद लागतात. रिक्षा आणि कारला सरासरी एक मिनिट आणि जड वाहनांची चाचणी सरासरी तीन मिनिटांत संपवली जाते. राज्याच्या परिवहन आयुक्तांची भेट घेऊन त्यांना याबाबत स्पष्ट माहिती दिली. त्यांना तसे निवेदनही दिले आहे. जर, मोटरवाहन कायद्यानुसार वाहन परवाना देताना निकषांची पूर्तता केली जात नसेल, तर आरटीओ बंद करावीत, अशी मागणीही त्यांच्याकडे केली आहे.'

पान ४ वर

## शब्दांच्या पलीकडले

सर्व छायाचित्रे : तन्मय ठोंबरे tanmay.thombre@civicmirror.in TWEET @tanmaytmirror



















### अशी ही लपवा लपवी!

जंगली महाराज रस्त्यावरील मेट्रो स्थानकाकडे जाणाऱ्या जिन्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून ठप्प आहे. पुढील महिन्यात जी-२० सदस्य राष्ट्रांची बैठक पुन्हा पुण्यात होत असून हे अर्धवट काम झाकण्यासाठी प्रस्तावित स्थानकांचे दर्शन घडवणारे फ्लेक्सचे बोर्ड असे अधांतरी लावले आहेत. लावलेले फ्लेक्स आणि त्यामागील स्थिती दर्शवणारी ही छायाचित्रे.







# अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न

## अनधिकृत होर्डिंग दुर्घटना चौकशी अहवाल पाठवण्याचा शासनाचा आदेश ठेवला आठ दिवस दडवून


**रोहित आठवले**
Rohit.Athavale@civicmirror.in
TWEET@RohitA_Mirror



अनधिकृत होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत पाच जणांचा बळी गेला. याप्रकरणात संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून अहवाल सादर करण्याचे आदेश शासनाने आठ दिवसांपूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेला दिले आहेत. मात्र, याबाबत शासनाने मंगळवारी (२ मे) पाठविण्यात आलेले पत्रच बाहेर येऊ दिले गेले नसल्याचे आता उघडकीस येत आहे.

अनधिकृत होर्डिंग कोसळल्याने कात्रज-देहूरोड बाह्यवळण मार्गावर रावेत-किवळे येथे १७ एप्रिल रोजी पाच जणांचा बळी गेला होता. या वेळी तीनजण गंभीर जखमी झाले होते. याप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करीत जागा मालक नामदेव बारकू म्हसुडगे याला अटक करण्यात आली होती. तसेच होर्डिंगसाठी परवाना मागणारा आणि परवानगीशिवाय होर्डिंग उभारणाऱ्या दत्ता गुलाब तरस तसेच होर्डिंग भाडेतत्त्वावर घेणाऱ्या महेश तानाजी गाडे आणि जाहिरात करणारी कंपनी,

> शासनाकडून पत्र आले आहे. संबंधित विभागाचे सहायक आयुक्त सुट्टीवर आहेत. चौकशी सुरू करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. सहायक आयुक्त आल्यावर चौकशी होऊन अहवाल शासनाला पाठविण्यात येईल.
> – **जितेंद्र वाघ,** अतिरिक्त आयुक्त पिंपरी-चिंचवड महापालिका.

इतर संबंधितांवर गुन्हा दाखल झाला. त्यांचा शोध अजून सुरु आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील १९२ विना परवाना होर्डिंग धारकांनी सुरुवातीला महापालिकेच्या कारवाई विरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर महापालिकेने ज्या होर्डिंग चालक-मालकांनी परवानगी घेतलेली नाही, त्यांना परवानगीसाठी अर्ज करण्यास सांगितले होते. याबाबत अर्ज आल्यानंतर एकत्रित ४३४ होर्डिंगवर पुढील सुनावणी होईपर्यंत कारवाई जैसे-थे ठेवण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, त्यानंतरही दोन वर्ष या सगळ्या ४३४ होर्डिंग मालकांनी व्यवसाय करून शासनाचा महसूल बुडविला होता.



अखेर किवळे दुर्घटनेनंतर महापालिका आणि होर्डिंग संघटनेने परस्पर संमतीने बनविलेल्या मसुद्याला परवानगी देत हे होर्डिंग अधिकृत करण्याची प्रक्रिया राबविण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले.

किवळे येथील दुर्घटना घडल्यानंतर महापालिकेचा अग्निशमन विभाग सोडला



शहर | सिव्हिक मिरर

अनधिकृत होर्डिंग कोसळून पाच मृत्युमुखी


तर एकही वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी उशिरापर्यंत दाखल झाला नव्हता. पोलीस आयुक्त, विभागीय आयुक्त यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. महापालिकेच्या संबंधित विभागाची जबाबदारी असणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना पाठिशी घालण्याचा प्रकार महापालिकेतील अति वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून झाला.

त्यानंतर २ मे रोजी शासनाच्या नगरविकास विभागाचे कक्ष अधिकारी शिवाजी चव्हाण आणि उप सचिव प्रियंका कुलकर्णी-छापवाले यांनी महापालिका आयुक्तांना पत्र पाठविले आहे. या पत्राद्वारे यापुढे अशी दुर्घटना घडणार नाही याची जबाबदारी आयुक्तांवर राहिल असे सुचित करण्यात आले आहे.

त्याचबरोबर दुर्घटनेनंतर चौकशी करून अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आठ दिवसात हा अहवाल सादर करावा असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. परंतु, अद्यापपर्यंत याची चौकशीच अद्याप सुरू करण्यात आलेली नाही. यामुळे अहवाल शासनाला पाठविण्यात आलेला नाही.

छायाचित्रे : ओश्विन कढव







मणिपूरमध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराच्या विरोधात पुण्यात राहणाऱ्या मणिपुरी विद्यार्थ्यांनी बुधवारी (दि. १०) शांतता मार्चचे आयोजन केले होते. यात पुणेकरदेखील मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. सर्वांनी मेणबत्त्या पेटवून शांततेचा संदेश दिला.

# डीटीडीसी कुरिअरमधून पुन्हा तलवार!

## मणिपूर राज्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर आसामला जाणारे पार्सल दिघी पोलिसांकडून जप्त

रोहित आठवले
rohit.athavale@civicmirror.in
TWEET@RohitA_Mirror

डीटीडीसी या कुरिअर कंपनीची सेवा वापरून तलवार पाठवण्याचा प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. पार्सलद्वारे अहमदनगरमधून आसामला जाणारी तलवार दिघी पोलिसांनी जप्त केली आहे.

डीटीडीसी कुरिअर कंपनीच्या सेंट्रल गोडावूनमध्ये ही तलवार आल्यानंतर ही बाब उघडकीस आली आहे. सुरेश दळवी (रा. अहमदनगर) नामक व्यक्तीवर याप्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यापूर्वी संभाजीनगरमध्ये मार्च २०२२ मध्ये डीटीडीसी पार्सल विभागातून तलवारी ताब्यात घेण्यात आल्या होत्या.

तसेच यापूर्वी संभाजीनगरमध्ये दोन वेळा हत्यारांचा साठादेखील जप्त करण्यात आला होता. संभाजीनगरमधील पाच आणि जालना मधील दोघांनी ३७ तलवारी मागविल्याचे उघडकीस आले होते. या घटनेनंतर दिघीमधील मध्यवर्ती गोडाऊनमध्ये पिंपरी-चिंचवड पोलिसांनी तपासणी मोहिम हाती घेतली होती. तेव्हा दिघीत पार्सलमध्ये ९७ तलवारी आढळून आल्या होत्या.




प्रातिनिधीक छायाचित्र

सध्या मणिपूर राज्यात तणावाचे वातावरण आहे. आसाम आणि अन्य राज्यांमध्येही त्याचे पडसाद उमटत असल्याने या भागातून येणाऱ्या आणि या भागात जाणाऱ्या पार्सल, प्रवासी वाहनांबाबत पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे.

डीटीडीसी कुरिअरमार्फत विमानाने जाणाऱ्या सगळ्या पार्सलचे रोज एक्स-रे स्कॅनिंग करण्यात येते. त्याचबरोबर दररोज होणाऱ्या स्कॅनिंगमध्ये संशयास्पद अथवा वेगळी वस्तू तर नाही ना, याची पाहणी पोलिसांकडून दैनंदिन पातळीवर होत असते. त्यातून ही बाब उघड झाली असून, हवालदार सुरेश शिंदे यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मणिपूरमध्ये सुरु असलेल्या हिंसाचाराच्या विरोधात माणिपूरमधील पुण्यात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी बुधवारी शांतता मार्चचे आयोजन केले होते. सायंकाळी ७ वाजता औंध येथील विद्यांचल शाळेत मूक शांतता पदयात्रा काढण्यात आली. असोसिएशन ऑफ मणिपुरी डायस्पोराचे (आमंड) अध्यक्ष कुलबिधु चानम यांनी पुण्यातील सर्व समाजातील लोकांना मूक मोर्चात सामील होण्याचे आमंत्रण दिले होते. त्याला पुणेकरांनी लक्षणीय प्रतिसाद दिला.

शांतता आणि सौहार्दासाठी यावेळी मेणबत्त्या पेटवून वाईट प्रवृत्तींचा निषेध करण्यात आला.

> विदर्भ आणि मुंबईव्यतिरिक्त संपूर्ण महाराष्ट्रातून डीटीडीसीमार्फत पाठविण्यात येणारे पार्सल प्रथम दिघीमध्ये येते. विमानाने जाणारे सर्व पार्सल एक्स-रे मशिनमधून तपासले जाते. त्यानंतर त्यामध्ये ड्रग्ज, हत्यारे अथवा अन्य संशयित काही वस्तू आढळून आल्यास आम्ही तत्काळ नजिकच्या पोलिसांना ही माहिती देत असतो. यापूर्वीदेखील आम्ही अशी माहिती कळवून अहमदनगरला जाणाऱ्या तलवारीचे पार्सल पोलिसांकडे सुपूर्त केले होते.
>
> – **रणजितसिंग**, दक्षता व्यवस्थापक, डीटीडीसी

आमंडचे सहसचिव सैरेम रोमेन म्हणाले, "मी मीथेई समुदायाचा आहे आणि मी हिंसेचा निषेध करतो. माझा शांतता आणि एकतेवर विश्वास आहे. आम्ही मणिपूरमध्ये शांततेसाठी प्रार्थना करण्याकरिता हा मेळावा घेत आहोत. आम्हाला एकता दाखवायची आहे. आम्हाला वाद घालायचा नाही, समस्या निर्माण करायची नाहीत. आम्ही शांततेसाठी उभे आहोत"

# विवाहितेला काढायला लावल्या १५० उठाबशा

## सासरच्यांकडून गळा दाबून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न, किवळेतील आदर्शनगर येथील प्रकार

ओंकार गोरे
omkar.gore@civicmirror.in
TWEET@OmkarVGore

घरगुती कारणावरून विवाहितेला त्रास देत गळा दाबून जीवे ठार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच महिलेला घरात जबरदस्तीने १५० उठाबशा काढायला लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.


पिंपरी-चिंचवडमधील किवळेतील आदर्शनगर येथील के. व्हीला सोसायटीमध्ये मंगळवारी (दि. ९) दुपारी दीडच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी २१ वर्षीय पीडित विवाहितेने देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, जावेद मुबारक मुल्ला, मुबारक मुल्ला, मोहसीन मुबारक मुल्ला, दोन महिला (सर्व रा. आदर्शनगर, किवळे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देहूरोड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचा २६ डिसेंबर २०२१ रोजी विवाह झाला होता. लग्नापासून ती घरकाम करते तर तिचा पती नोकरीस आहे. मात्र, लग्न झाल्यापासून विवाहित महिलेचा सासरच्या मंडळींकडून सातत्याने छळ करण्यात आला. छोट्या छोट्या गोष्टींवरून तिला दिराने कमरेच्या बेल्टने मारहाण केली. या सगळ्या प्रकारात पीडितेच्या पतीनेही सासरच्या मंडळीना साथ दिली.

मंगळवारी दुपारच्या सुमारास मात्र सासरच्या मंडळींनी हद्दच ओलांडली. पीडित महिलेचा गळा दाबून ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पीडितेला दिराने जबरदस्तीने १५० उठबशा काढायला लावल्या. अशा मानसिक आणि शारीरिक त्रासाने त्रस्त झालेल्या पीडित विवाहितेने अखेर आपल्या वडिलांना बोलावून घेत देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलीसांनी जावेद मुबारक मुल्ला, मुबारक मुल्ला, मोसिन मुबारक मुल्ला आणि दोन महिलांविरोधात कलम ३०७, ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

एकीकडे महिला पुरुषांच्याही पुढे भरारी घेत असल्याचे बोलले जाते. मात्र दुसरीकडे आजही महिलांचा छळ होताना दिसतो. राज्यातील कित्येक महिला आजही हुंडाबळी, मानसिक आणि शारीरिक छळवणूक, यांसह विविध प्रकाराला बळी पडताना पाहायला मिळतात. या प्रकारामुळे महाराष्ट्रातील महिला खरंच सुरक्षित आहेत का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

पीडित महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावेळी तिची आरोग्य तपासणी करण्यात आली. नंतर पीडित महिलेला तिच्या वडिलांकडे सुपूर्त करण्यात आले आहे. सध्या हे प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत अधिक तपास सुरु आहे, अशी माहिती देहूरोड पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक आशिष जाधव यांनी दिली.



चित्र : अतुल बेलोकर

शिफ्टच्या वेळा : सकाळी ८ ते १२ आणि दुपारी ४ ते ८

अधिक माहितीसाठी, कॉल किंवा व्हॉट्सॲप ९३७३५८१९७७


कुठे : पुण्यातील ३० ट्रॅफिक सिग्नल

# सावध राहा, सतर्क राहा!

पुणे टाइम्स मिरर, सीविक मिरर आणि पुणे शहर वाहतूक पोलिस विभागाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या 'जरा देख के चलो' या उपक्रमात अनेक उत्साही पुणेकर मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी काही लोक आपआपल्या ग्रूप्ससोबत, तर काही अगदी एकट्यानेच रस्त्यावर उतरताना दिसत आहेत.

उंड्री चौकातही पुणेकरांनी त्यांच्या सजगतेचे उत्तम दर्शन घडवले. ते रस्त्यावरील वाहनचालकांना वाहतूक नियमनाचे धडे देत होते.उपक्रमात सहभागी झालेले कार्यकर्ते इतरांना वाहनांचा वेग कमी ठेवा, सिग्नल पाळा अशा सूचना अत्यंत तळमळीमने करत होते. उपक्रमात सहभागी झालेले सजग नागरिक वाहतूक पोलिसांना वाहतुकीचे नियमन करण्यात मदत करत होते आणि वाहतूक पोलिसांकडून नियमनाचे धडेही घेत होते. सुरक्षा आणि सतर्कता सर्वांसाठीच महत्त्वाची असल्याचे मत सहभागी झालेल्या नागरिकांनी व्यक्त केले.

'जरा देख के चलो' उपक्रम ग्रॅव्हिटस फाऊंडेशनच्या साहाय्याने राबवण्यात येत असून, द माईल्स पुणे व सेलेबॅलिटी यांचे सहकार्य लाभले आहे. न्याती ग्रूपच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवला जात असून, लोकमान्य को-ऑपरेटिव्ह सोसायटी आणि शिवतारा प्रॉपर्टीज यांनी या उपक्रमास पाठिंबा दिला आहे. कुश चतुर्वेदी 'नॉलेज पार्टनर' आहेत.










छायाचित्रे : राहुल देशमुख

# वीस सेकंदात 'परवाना'ही

पान १ वरून



इन्स्टिट्यूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग रिसर्चच्या (आयडीटीआर) निकषानुसारच वाहन परवाने दिले जात आहेत. योग्य पद्धतीने चाचणी घेऊनच परवाना दिला जातो.

**- अजित शिंदे,** प्रादेशिक परिवहन अधिकारी

## काही महत्त्वाचे निकष...

- वाहन कौशल्य चाचणीसाठी उमेदवाराकडे कमीत कमी ३० दिवसांचा शिकाऊ परवाना असणे आवश्यक
- वाहनाच्या मागील दृश्य दिसण्यासाठी आरशाचा योग्य वापर केला जातो की, नाही याची तपासणी
- इंजिन सुरू करण्यापूर्वीची योग्य ती खबरदारी.
- वाहन सुरू केल्यानंतर पहिल्या गिअरपासून सर्वात वरच्या (टॉप) गिअरपर्यंत वाहन कसे चालवले जाते?
- रहदारीची स्थिती बदलल्यास टॉप गिअरवरून खालच्या गिअरवर वाहन कसे आणले जाते?
- उतारावर वाहन असताना ते लगेच खालच्या गिअरवर कसे घेतले जाते?
- कार चढावर थांबवल्यानंतर हँडब्रेक आणि फूटब्रेकचा वापर करून ती मागे ढकलली न जाता थांबवता येते का? डावीकडे आणि उजवीकडे वळताना सिग्नल देण्यापूर्वी आरशाचा वापर कसा केला जातो?
- ओव्हरटेक करताना आणि दुसऱ्या वाहनाला ओव्हरटेक करण्याची परवानगी देताना काय केले पाहिजे आणि कोणते सिग्नल दिले जातात याची तपासणी
- डावीकडे आणि उजवीकडे वळताना इंडिकेटर अथवा हाताचा वापर कसा केला जातो?
- लेन बदलताना सिग्नलिंग कसे केले जाते?
- आपत्कालीन स्थितीत वाहन थांबवून योग्य सिग्नल देऊन वाहन सुरक्षितपणे बाजूला कसे घ्यावे?
- वाहन रिव्हर्स घेताना ते डावीकडे अथवा उजवीकडे कसे घेतले जाते?
- वाहतूक चिन्हे, वाहतूक दिवे, पोलीस यांनी दिलेल्या सिग्नलवर तत्पर कारवाई कशी केली जाते?
- पादचारी रस्ता ओलांडताना घेतली जाणारी काळजी.
- रस्त्याचा प्रकार आणि रहदारीनुसार वेग नियंत्रित करणे.
- कारच्या मागील दृश्ये दर्शवणाऱ्या आरशाचा वापर केला जातो की नाही?
- सामान्यपणे कार चालविताना आत्मविश्वासाने स्टेअरिंग, गिअर आणि ब्रेकचा वापर केला जातो की नाही?
- कार सुरू करण्यापूर्वी, सिग्नल देताना, ओव्हरटेक करताना, वळताना, वाहन थांबवताना आरशाचा वापर केला जातो की नाही?

छायाचित्र : राहुल देशमुख




## जिवाशी खेळ...

सातारा रस्त्यावर एक कामगार सुरक्षेच्या कोणत्याही साधनांशिवाय होर्डिंग लावण्याचे काम करताना दिसून आला. पोटाची खळगी भरण्यासाठी अशा प्रकारे जिवावर उदार होणे हे कधी तरी जिवावरच बेतेल, हे त्याच्यासारख्या अनेक कामगारांना कधी कळेल का?

संकल्पना : **विजय चव्हाण** | चित्र : **अतुल बेलोकर**




## ट्विटर Civic मिरर

@ गेल्या तीन महिन्यांपासून वीजबिल न भरणाऱ्या ७० हजारांवर थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा महावितरण कडून खंडित केला जाणार आहे. यापैकी पुणे परिमंडळात १६ हजार थकबाकीदारांवर तातडीने कारवाई करण्यात आल्याचेही कळते. सेवेबाबतही हीच तत्परता महावितरण का दाखवत नाही? त्याबाबत बोंब असताना निर्ढावलेपणा दाखवला जातो.

**- पुरेपूर पुणेरी**

@ चांदणी चौक उड्डाणपुलाला मुळशी सत्याग्रहाचे नायक सेनापती बापट यांचे नाव देण्याची मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. ही मागणी मान्य करायला आयुक्तांना अडचण येणार नाही, अशी अपेक्षा आहे.

**- प्रशांत शिंदे**

@ पुणे शहरात दर गुरुवारी पाणी कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेच्या नियोजनातील त्रुटीचा फटका लाखो पुणेकरांचा बसतो. थोडी तरी संवेदनशिलता बाळगा. लिकेजमुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते. त्यावर उपायोजना कधी करणार? पुण्याचे नवे-जुने भाग्यविधाते म्हणून मिरवणाऱ्यांनी आता तरी शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा गंभीरपणे विचार करून पाण्याची सोय करावी.

**- विनोद जाधव**


@ म्हणतात ना पुणे तिथे काय उणे! आमच्या स्मार्टसिटीत पीएमपीच्या ई-बसचे छत चक्क हवेत उडाले होते. असा पराक्रम इतर शहर करून दाखवणार काय? व्वारे स्मार्ट सिटीची स्मार्ट बस!

**- रियाझ शेख**

# आयटी पार्क कोंडीमुक्त!

## ऑटोमेटेड सिग्नल यंत्रणा आणि एकेरी वाहतुकीमुळे भूमकर चौकात वाहतूक सुरळीत

**रोहित आठवले**
rohit.athavale@civicmirror.in
TWEET@RohitA_Mirror





आयटीपार्क हिंजवडी परिसरातून महामार्गावर येताना भूमकर चौकात होणारी वाहतूक कोंडी अखेर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सोडविली आहे. ऑटोमेटेड् सिस्टीमचा वापर करीत एक सिग्नल येथे उभारण्यात आला असून, ज्या दिशेला जास्त वाहने असतील तेथील सिग्नल स्वयंचलित पद्धतीने चालत असल्याने वाहन चालकांनी आता सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

ग्रामपंचायत आणि महापालिकेच्या सीमेवर असलेल्या हिंजवडी आयटी पार्कमध्ये वाहतूक कोंडीसह अन्य मूलभुत समस्यांची मोठी यादी आहे. महापालिकेच्या हद्दीतील मोठे रस्ते तर हिंजवडी ग्रामपंचायत हद्दीतील अरूंद रस्त्यांमुळे वाहनांच्या रांगा येथे कायमच पहायला मिळतात. सध्या मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्याचे काम हिंजवडीत सुरू आहे. आयटी पार्क हिंजवडीमधून बाहेर येण्यासाठी असलेल्या रस्त्यांपैकी एक रस्ता मेट्रोच्या कामामुळे जवळपास निम्मा राहिला आहे. तर लक्ष्मी चौक, कस्तुरी चौक, म्हारुंजी चौक आणि शिवाजी चौक हिंजवडीमधून भूमकर चौकात येणाऱ्या वाहनांच्या एक दीड किलोमीटरपर्यंत रोज रांगा लागत होत्या.

यामध्ये प्रामुख्याने भूमकर चौकातून कस्तुरी चौकाकडे (हिंजवडीच्या दिशेने) जाताना एका शेतकऱ्याने रस्त्याची एक पूर्ण बाजू मोबदला किती मिळावा, या वादातून अडवून ठेवली आहे. विशेष म्हणजे, महापालिका-ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधी यांना गेल्या १०-१५ वर्षात हा वाद मिटविता आला नव्हता. तो आता संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे.

दरम्यान, पुणे-बंगळुरू महामार्गावर हिंजवडी, भूमकर चौक आणि त्यापुढे रावेत-किवळेच्या दिशेने जाताना सेवा रस्त्यावर असलेल्या अंडरपासमध्ये खड्डे आणि गटारे तुंबत असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. आठ दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे तीन ते चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा या भागात लागल्या होत्या. याबाबत ट्विटरसह प्रत्यक्षपणे नागरिकांनी पोलिसांना दोष देत यावर तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली होती. तर रस्ते दुरूस्ती, गटारे, पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी ड्रेनेज, पुरेसे रस्ते या सुविधा महापालिकेकडून करणे अपेक्षित असताना त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झालेले दिसून येते.

दरम्यान, या सगळ्या प्रकारानंतर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत तत्काळ तोडगा काढण्याच्या सूचना केल्या होत्या. तसेच महापालिका, महामार्ग रस्ते बांधणी विभाग आणि अन्य विभागांशी समन्वय ठेवून उपाययोजना करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर पोलीस सहआयुक्त डॉ. संजय शिंदे, अतिरिक्त आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त डॉ. काकासाहेब डोळे वाहतूक विभागाचे सहायक आयुक्त सतीश माने यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून भूमकर चौकातील वाय जंक्शन येथे एकेरी वाहतूक करण्याचे नियोजन केले आहे.

पुण्याकडून येणाऱ्या वाहनांना भूमकर चौकातून डांगे चौकाच्या दिशेने जाण्यासाठी ७०० मीटर पुढे कस्तुरी चौकातून उजवीकडे वळून विनोदे चौकातून पुन्हा उजवीकडे वळून जाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर भूमकर चौक ते कस्तुरी चौक-विनोदे चौक या रस्ता दोन्ही दिशेने एकेरी करण्यात आला आहे. त्याचबरोबर हिंजवडीकडून फेज १ व २ आणि म्हारुंजी फेज ३ कडून येणारी वाहतूक विनोदे चौकाच्या दिशेने वळविण्यात आली आहे. त्यामुळे सगळीकडून येणारी वाहने विनोदे चौकात अडकून पडू नये यासाठी इंटेलिजंट स्मार्ट सिग्नल सिस्टिम (स्वयंचलित सिग्नल यंत्रणा) उभारण्यात आली आहे. यासाठी येथे बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे कोणत्या दिशेने किती वाहने आली आहेत, ते पाहून त्या दिशेचा सिग्नल प्रथम सुरू होत आहे. त्यामुळे वाहतूक थांबून राहण्याचे प्रकार गेल्या आठ दिवसांपासून बंद झाले आहेत.

> पुण्याकडून येऊन डांगे चौकाकडे जाणारी वाहने, हिंजवडीच्या तिन्ही फेजकडून डांगे चौक किंवा भूमकर चौकातून पुण्याकडे जाण्यासाठी अरूंद रस्ता आहे. त्यामुळे भूमकर चौक परिसरात एकेरी वाहतूक करण्याचे नियोजन केले असून, विनोदे चौकात सगळीकडील वाहने येणार असल्याने तेथे कोंडी होणार नाही यासाठी आयटी पार्क हिंजवडीमधीलच एका स्टार्टअप कंपनीची मदत घेण्यात आली आहे. त्यांनी खास या परिसरासाठी स्वतंत्र आणि ऑटोमेटेड् सिग्नल यंत्रणा तयार करून दिली आहे.
>
> – **सुनील पिंजण**, वरिष्ठ निरीक्षक वाहतूक विभाग

> रिअल टाईम ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टीम तयार करण्यात आली आहे. यामध्ये कोणत्या दिशेने किती वाहने येत आहेत ते कॅमेरा सेंस करून तत्काळ ज्या दिशेने वाहने अधिक आहेत, तेथील सिग्नल ग्रीन होत असल्यावरून कळते. त्याचबरोबर एखाद्या दिशेने ॲम्ब्युलन्स येत असेल तर त्या दिशेचा सिग्नलही ऑटोमेटिक ग्रीन होतो. आम्ही स्वतः या वाहतूक कोंडीत अडकत होतो. त्यामुळे अनेक दिवस रिसर्च केल्यानंतर आम्ही सिग्नल तयार केला आहे.
>
> - **प्रदीप गिलबिले**, सॉफ्टवेअर इंजिनिअर स्टार्टअप कंपनी



# मंगला बनसोडेंच्या लोकनाट्य तमाशात पोलिसाला मारहाण

**सीविक मिरर ब्यूरो**
feedback@civicmirror.in

मंगला बनसोडे यांच्या लोकनाट्य तमाशाच्या कार्यक्रमामध्ये २० जणांच्या टोळक्याने एका पोलीस कर्मचाऱ्यास काठीने आणि लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याची माहिती समोर आली आहे.

अजनावळे (ता. जुन्नर) या ठिकाणी आदिवासी महोत्सवानिमित्त लोकनाट्य तमाशाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बंदोबस्तावर असलेल्या तौफिक शेख या पोलीस कर्मचाऱ्याला २० ते २५ जणांच्या जमावाने काठीने आणि लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली आहे. याप्रकरणी विविध कलमान्वये जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी किरण लांडे या आरोपीस अटक करण्यात आली आहे.

जुन्नरपासून ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या अजनावळे या गावात रविवार आणि सोमवारी (दि. ७ आणि ८) आदिवासी महोत्सव होता. गावाकडील यात्रेसारखेच या महोत्सवाचे स्वरूप असते. वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम, कुस्त्यांचे आखाडे यामध्ये आयोजित केले जातात. सोमवारी मंगला बनसोडे यांच्या लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी गावाच्या समितीने पोलिसांची रीतसर परवानगीही घेतली होती. त्याठिकाणी पोलीस बंदोबस्तासाठी होते. कार्यक्रम चालू असतानाच प्रेक्षकांमधील काहींचा आरडाओरडा, किंचाळणे, शिट्ट्या वाजवणे चालू होते. मात्र यापुढे जात एका टोळक्याने गोंधळ घालायला सुरवात केली.


या वेळी स्टेजच्या डाव्या बाजूकडील काही तरुण गोंधळ करू लागल्याने येथे बंदोबस्तासाठी उपस्थित असलेले पोलीस कर्मचारी त्यांना शांत बसण्यास सांगायला गेले. त्याचा राग आल्याने एका तरुणाने पोलीस कर्मचाऱ्यास शिवीगाळ आणि मारहाण करण्यास सुरवात केली. त्यावेळी येथील २० ते २५ तरुणांच्या टोळक्याने चिडून पोलीस कर्मचाऱ्यास लाकडी काठीने तसेच लाथाबुक्कांनी मारहाण केली.

त्यावेळी इतरत्र तैनात असलेले पोलीस अधिकारी कर्मचारी याठिकाणी येऊन त्यांनी तौफिक शेख यांना गर्दीतून बाहेर काढले. आरसीपी पथकातील तौफिक शेख यांनी याबाबत फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी शंकर डोळस, घनशाम लांडे, सूरज विरणक, तुषार लांडे, तुषार साबळे, संदीप घुटे, सचिन लांडे, गणपत घोटघर, बुदा वालकोळी, युवराज वालकोळी, वसंत लांडे, युवराज आढारी, निंबा मांगले, रोहित लांडे, रामदास लांडे, लालू ईदे, अशोक लांडे, सागर घोटघर, किरण लांडे, कुणाल कोदे तसेच इतर पाच ते सहा जण यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. यातील सर्व आरोपी हे अजनावळे गावाचे रहिवासी आहेत. यातील तरुणांच्या तोंडाच्या वासावरून त्यांनी मद्यपान केल्याचा अंदाज प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप पर्वते करत आहेत.



**पोलिसाला मारहाण करणारा एक आरोपी**

# तुम्हीही व्हा Civic जर्नालिस्ट!



तुमच्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी, तुम्हाला जाणवणाऱ्या समस्या, त्यावरचे उपाय हे सगळे मांडण्यासाठी आता तुमच्यासाठी हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करून देत आहोत. त्याद्वारे तुम्ही आम्हाला फोटो, व्हीडीओ आणि बातम्या पाठवू शकता. हे करताना आपले संपूर्ण नाव आणि मोबाईल क्रमांक आवर्जून द्या.



ई-मेल : civicjournalist@civicmirror.in



## कचऱ्यामुळे दुर्गंधी

डेक्कन महाविद्यालयाच्या जवळ कचऱ्याचा मोठा ढीग निर्माण झाला आहे. येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांनी तेथे खाद्यपदार्थांच्या पाकिटांसह नानाविध गोष्टी रस्त्याच्या कडेला टाकलेल्या दिसतात. यामुळे परिसरात रोगराई निर्माण होण्याची शक्यता आहे. याचा त्रास स्थानिक नागरिकांना, पादचाऱ्यांना सहन करावा लागत आहे.



अमित जगताप
येरवडा





सुदर्शन पाटील,
पुणे कॅम्प

## गतिरोधकांची दुरवस्था

विधानभवन रस्त्यावरील गतिरोधकांची दुरवस्था झाली आहे. गतिरोधक मध्येच तुटले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना त्यांचा अंदाज न येऊन अपघात होण्याचा धोका वाढला आहे. प्रशासनाने यावर योग्य ती कार्यवाही करावी.



## रस्त्यावरच राडारोडा

साल्सबरी पार्कजवळ रस्त्याच्या कडेला गेल्या काही दिवसांपासून राडारोडा टाकलेला दिसतो आहे. यामुळे वाहने घसरण्याचा धोका निर्माण झाला असून, अपघात होऊ शकतात. राडारोड्यामुळे दुर्गंधी पसरून डासांची उत्पत्तीदेखील वाढू शकते.



श्रीरंग दाणी,
कॅम्प

शहर

# धरणांच्या सुरक्षेसाठी झटणाऱ्या माहिती अधिकार कार्यकर्त्याचा सन्मान

## धरणांसाठी तब्बल ३,००० 'आरटीआय' केल्याबद्दल दीपक बच्चे-पाटील यांना 'सजग नागरिक' पुरस्कार

प्रिन्स चौधरी
feedback@civicmirror.in

माहितीच्या अधिकारासाठी (आरटीआय) काम करणारे कार्यकर्ते दीपक बच्चे-पाटील हे सध्या देशभरातील धरणे वाचविण्याच्या मोहिमेवर आहेत. एकूण २२ राज्यातील धरणांच्या देखभाल आणि दुरुस्तीच्या अभावामुळे उद्भवणारे धोके प्रशासनाच्या ध्यानात आणून देण्यासाठी गेल्या १० वर्षांत ३००० हून अधिक माहिती अधिकार अर्ज दाखल केले आहेत. त्यांच्या अभ्यासपूर्ण सूचना अनेक राज्य सरकारी संस्थांनी स्वीकारल्या आहेत. अनेक संभाव्य धोके टाळण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

या प्रयत्नांची दखल घेऊन सजग नागरिक मंच या स्वयंसेवी संस्थेच्या १९९ व्या सभेत पाटील यांना सोमवारी 'सजग नागरिक माहिती अधिकार पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले मध्य प्रदेशचे माहिती आयुक्त राहुल सिंग यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी बच्चे - पाटील म्हणाले, "मी २२ राज्यांमध्ये धरणाशी संबंधित समस्यांवर प्रकाश टाकणारे ३००० हून अधिक अर्ज दाखल केले आहेत. धरणांच्या स्थितीचा सविस्तर अभ्यास केल्यामुळे माझ्या सूचनांची अंमलबजावणीही अनेक राज्यांनी केली आहे. धरणांमध्ये सतत गाळ साचल्याने त्यांची क्षमता कमी होत आहे. अनेक धरणांची ३० ते ५० टक्के क्षमता कमी झाली आहे. यामुळे भविष्यात धरणे निकामी होऊ शकतात आणि कालांतराने पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते',अशी माहिती त्यांनी दिली.



**मध्य प्रदेशचे माहिती आयुक्त राहुल सिंग यांच्या हस्ते दीपक बच्चे-पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

बच्चे पाटील एक फॅब्रिकेशन वर्कशॉप चालवतात. दिवसातून फक्त एक तास व्यवसायासाठी दिल्यानंतर उरलेला दिवस तो समाजकार्यात घालवतात याव्यतिरिक्त, अनाथ, अंध आणि अपंग मुलांच्या कल्याणासाठी ते कार्यरत असतात.

मध्य प्रदेशचे माहिती आयुक्त राहुलसिंग म्हणाले, 'नागरिक आरटीआय तक्रारी दाखल करण्यासाठी दूर-दूरच्या भागातून भोपाळला जात असत. हे काम वेळखाऊ आणि खर्चिकही होते. आम्ही सोशल मीडियाचा वापर करून ही प्रक्रिया सोपी केली. आता लोक व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून तक्रारी करू शकतात. कॉन्फरन्स कॉलवर फॉलो-अप करू शकतात. निकाल महिन्यांऐवजी काही दिवसांत मिळू लागला आहे.'

सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर म्हणाले की, 'गेल्या १४ वर्षांपासून आरटीआय क्षेत्रातील अनुकरणीय कार्याचा गौरव करण्यासाठी आमचा मंच वर्षातून एकदा पुरस्कार देतो. आम्ही विविध संस्था, माहिती अधिकाराचे प्रथम आणि द्वितीय अपील दाखल करण्यासाठीही लोकांना मदत करतो.'

# शहराचा पाणीपुरवठा आता दर गुरुवारी बंद

#पुणे

पुणेकरांचा प्रत्येक गुरुवार आता कोरडाच जाणार असल्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. या पार्श्वभूमीवर खडकवासला धरणसाखळीतील उपलब्ध पाणीसाठा विचारात घेऊन महापालिकेने पुढील काळातील पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी पाणीकपात करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका आयुक्त विक्रमकुमार आणि पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी मंगळवारी ही माहिती दिली. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच कालवा समितीची बैठक झाली होती.

आठवड्यातील एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवल्यानंतर दुसऱ्या दिवशी ज्या भागातील पाणीपुरवठा विस्कळित होतो, अशी वीस ठिकाणे महापालिकेने निश्चित केली आहेत. त्या ठिकाणी 'एअर व्हॉल्व्ह' बसविण्यात आले आहेत. त्यामुळे तो पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी मदत होईल, तसेच या भागात पर्यायी व्यवस्था म्हणून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जाईल. पावसकर म्हणाले, "जलवाहिन्यांत 'एअर ब्लॉक' येत असल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळित होतो. ही अडचण दूर करण्यासाठी 'एअर व्हॉल्व्ह' बसवून तो सुरळीत करता येऊ शकतो, असे निदर्शनास आले आहे.

खडकवासला धरणसाखळीतील चार धरणांत मिळून आजच्या घडीला ९.७८ टीएमसी इतका पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवशी ९.२० टीएमसी इतका साठा शिल्लक होता.

feedback@civicmirror.in

# धोका नाही, सरकार स्थिर!

## मुख्यमंत्री शिंदेंच्या राजीनाम्याची शक्यता उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी फेटाळली, आज जजमेंट डे?



#मुंबई

आमचे सरकार स्थिर आहे, असा दावा करीत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राजीनामा देणार नाहीत. तेच मुख्यमंत्री राहतील. पुढची निवडणूक एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच होईल," असे बुधवारी (दि. १०) ठामपणे सांगितले.

सर्वोच्च न्यायालय महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा निकाल गुरुवारी (दि. ११) देण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी हा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर आताच अंदाज वर्तवणे शक्य नाही. मात्र, आपण आशावादी असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केले. ते मुख्यमंत्री झाले. त्यांच्या या साऱ्या कृतीला उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीतर्फे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. आता या प्रकरणाचा निकाल गुरुवारी लागण्याची शर्यता वर्तवण्यात येत आहे. तसे संकेत सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशाच्या राजकीय क्षेत्राचे या निकालाकडे लक्ष लागून आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "सर्वोच्च न्यायालयाच्या आम्ही आशावादी आहोत. कारण आमची केस मजबूत आहे. त्यामुळे योग्य निकाल येईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे. अर्थात निकाल येईपर्यंत आपण थांबले पाहिजे. त्याकरिता खूप त्यासदर्भात भाकित वर्तवणे योग्य नाही. सुप्रीम कोर्ट हे सर्वोच्च आहे. त्यांच्या निकालाकडे गांभीर्याने बघितले पाहिजे. त्याच्यावर कुठलाही अंदाज व्यक्त करणे योग्य नाही."

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालापूर्वी एकनाथ शिंदे राजीनामा देतील, अशी चर्चा असल्याचे फडणवीस यांना विचारले असता ते म्हणाले की, "माफ करा, पण थेट शब्द वापरतो. हा मुर्खांचा बाजार आहे. यापेक्षा मी जास्त काही बोलू शकणार नाही. एकनाथ शिंदे कशाकरिता राजीनामा देतील? काय कारण आहे? काय चूक केलीय त्यांनी? एकनाथ शिंदे राजीनामा देणार नाहीत. एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री राहतील आणि मी दाव्याने सांगतो की, पुढची निवडणूक एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच होणार. सरकार एकदम स्थिर आहे."

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठापुढे सुरू आहे. त्यात स्वतः सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांच्यासह न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली, न्यायमूर्ती एम. आर. शहा, न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा यांचा समावेश आहे. यातील न्यायमूर्ती एम. आर. शहा हे १५ मे रोजी निवृत्त होत आहेत. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीपूर्वी हा निकाल येण्याची दाट शक्यता आहे. दुसरीकडे, २० मे पासून सर्वोच्च न्यायालयाच्या उन्हाळी सुट्ट्याही सुरु होत आहेत. त्या २ जुलैपर्यंत असतील. एवढा दीर्घ विलंब सर्वोच्च न्यायालयालाही नको असेल.त्यामुळे हा निकाल गुरुवारी लागेल, असेच म्हटले जात आहे. **वृत्तसंस्था**

### अपात्र ठरवले तर...

सरकार स्थिर असून मुख्यमंत्री राजीनामा देणार नाही, असे उपमुख्यमंत्री ठामपणे म्हणत असले तरी सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने १६ आमदारांना अपात्र ठरवले, तर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागण्याची दाट शक्यता आहे. अशा स्थितीत नवे सरकार स्थापन करावे लागेल. मात्र, आमदार अपात्रतेचा निर्णय जर विद्यमान विधासभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांकडे सोपवला, तर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीपर्यंत शिंदे-फडणवीस 'जैसे थे' परिस्थिती ठेवू शकतात. या साऱ्या पार्श्वभूमीवरच केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री किरेन रिजीजू आणि राहुल नार्वेकर यांची काही दिवसांपूर्वी भेट झाली होती. त्या भेटीचीही चांगलीच चर्चा रंगली होती.




## प्रसिद्ध विधिज्ज्ञ अॅड. उज्ज्वल निकम यांचे मत

# ...तर सर्वोच्च न्यायालयाची निरीक्षणे विधिमंडळाला गंभीरपणे घ्यावी लागतील

#नागपूर


अॅड. उज्ज्वल निकम

साधारणतः स्वायत्त संस्थांना सर्वोच्च न्यायालय मार्गदर्शन करीत नाही. पण काही निरीक्षणे नोंदवते. ही निरीक्षणे अनिवार्य स्वरूपाची असतील, तर विधिमंडळाला त्याचा विचार गांभीर्याने करावा लागेल, असे मत सुप्रसिद्ध विधिज्ज्ञ उज्ज्वल निकम यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा निकाल गुरुवारी (दि. ११) जाहीर होण्याच्या शक्यतेवर अॅड. निकम यांनी ही लक्षवेधी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "न्यायपालिका आणि विधिमंडळ यांच्यात कुठेही संघर्षाची स्थिती निर्माण होता कामा नये. न्यायपालिका आणि विधिमंडळाने आपापली मर्यादा कधीही ओलांडली नाही. या महत्वाच्या प्रकरणात निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने काही मॅंडेटरी स्वरुपाचे निरीक्षण नोंदवली तर विधीमंडळ त्यासंदर्भातील आपली जबाबदारी टाळू शकणार नाही. विधीमंडळाला त्यावर गंभीरपणे विचार करावाच लागेल."

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने आठ ते नऊ याचिकांची एकत्रित सुनावणी घेतली. या एकत्रित सुनावणीमध्ये वेगवेगळे वादग्रस्त मुद्देही समोर आले. सोळा आमदारांची अपात्रता, नवीन अध्यक्षांची नियुक्ती, उपाध्यक्षांच्या विरुद्ध अविश्वास प्रस्ताव, दोन्ही गटांकडून व्हिप बजावणे आणि अशा परिस्थितीत राज्यपालांची एक कृती या बद्दलचे हे प्रश्न आहेत. यामुळे सर्वोच्च न्यायालय आता राजकीय संघर्षाचा चेंडू विधिमंडळात टोलवते की त्यावर आपली काही निरीक्षणे नोंदवते, हे पाहाणे औत्सुक्याचे ठरेल," असेही अॅड. निकम यांनी नमूद केले.

एकत्रित याचिकांच्या सुनावणीवरील निकालात सर्वोच्च न्यायालय या सगळ्यांचा एकत्रित निकाल देताना कुठल्या गोष्टीला प्राधान्य देते हे पाहाणे औत्सुक्याचे ठरेल. दहाव्या परिशिष्टानुसार विधिमंडळ अध्यक्षांकडे आमदारांच्या पात्र वा अपात्रतेचा निर्णय सोपविला जातो. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांनी तशी अपेक्षा व्यक्त करणे गैर नाही. पण, यात विधिमंडळाच्या अध्यक्षाच्या निवडीलाच सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीलाच आव्हान असताना सर्वोच्च न्यायालय त्यावर काय भाष्य करते, हा एक भाग महत्त्वाचा आहे, याकडेही अड. निकम यांनी लक्ष वेधले.

शिवाय १६ आमदारांच्या अपात्रतेची नोटीस उपाध्यक्षांनी काढली. हे सर्व प्रश्न एकमेकांत गुंतलेले आहेत. त्यामुळे न्यायालयाचा निर्णय एकमतानेही येऊ शकतो वा घटनापीठात मतभेदही राहू शकतात. या घटनापीठातील एक न्यायाधीश निवृत्त होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. ते निवृत्त होण्यापूर्वी निकाल येणे अपेक्षित आहे. दुदैवाने ते निवृत्त झाले. तर त्यांच्या जागी नव्याने न्यायाधीशांची नियुक्ती करावी लागेल. मग पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या'प्रमाणे सुनावणी सुरू होईल, अशी चिंतादेखील अॅड. निकम यांनी व्यक्त केली. **वृत्तसंस्था**

# महाराष्ट्रावरही 'मोचा'चे सावट?

#मुंबई

मोचा चक्रीवादळाचा फटका देशातील दक्षिणेकडे असणाऱ्या किनारपट्टी भागांना बसणार असून, यामुळे महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामानात सातत्यानं होणारे बदल पाहता आता वेधशाळेकडूनही दर दिवशी या परिस्थितीचा आढावा घेत त्या अनुषंगाने नागरिकांना वेळोवेळी सतर्क केलं जात आहे. गेल्या काही दिवसांपासून ज्या चक्रिवादळाची बरीच चर्चा पाहायला मिळाली होती, ते चक्रिवादळ आता पूर्णपणे सक्रिय होताना दिसत असून, बुधवारपासून (दि. १०) त्याचे रुपांतर एका भयंकर चक्रिवादळामध्ये होणार आहे.



महाराष्ट्राचं म्हणायचं झाल्यास राज्यावर या चक्रिवादळाचा थेट परिणाम होणार नसला तरीही ढगाळ वातावरण आणि अवकाळीचं सावट मात्र कायम राहणार आहे. शिवाय वादळ जसजसं पुढे सरकेल तसतसं देशाच्या दक्षिण किनारपट्टी भागावर याचे परिणाम दिसू लागणार आहेत. परिणामी येत्या दोन दिवसांत अंदमान- निकोबार बेट समुहामध्ये मुसधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शिवाय दक्षिण पूर्व बंगालचा उपसागर आणि अंदमानला लागून असणाऱ्या किनारपट्टी भागासह इतर राज्यांना लागून असणारा समुद्रही खवळलेला असेल. ज्यामुळं मासेमार आणि लहान जहाजांना समुद्रातन न जाण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान या वादळाचा मान्सूनवर थेट परिणाम होणार नसून, फक्त वातावरण ढगाळ राहील असंच आयएमडीकडूनही सांगण्यात येत आहे. पुढील २४ तासांमध्ये तामिळनाडू, तेलंगाणा, केरळ या राज्यांना आणि महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागाला पावसाचा इशारा देण्यात आला आहे. **वृत्तसंस्था**

# मानसिक आजार, व्यसनातून सावरणारी 'मुक्ता'ई

**संवाद हा कोणत्याही नात्याचा धागा असतो. मानसिक आजार आणि व्यसनांची लागण झालेल्या व्यक्तींना त्यांचे मूळ आयुष्य बहाल करण्यासाठी त्यांच्याशी सर्वप्रथम संवाद साधणे आवश्यक असते. हा संवाद साधल्यानंतर समुपदेशन आणि उपचार याद्वारे मानसिक आजार आणि व्यसनांची लागण झालेल्या विविध वयोगटातील हजारो नागरिकांना 'मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशन' या ट्रस्टने नवे आयुष्य बहाल कले आहे. याबरोबरच, वयात येऊ पाहणाऱ्या मुलांसाठी 'स्कूल बियाँड बुक्स' अर्थात 'शाळा पुस्तकांच्या पलीकडे' हा अनोखा उपक्रमदेखील या फाउंडेशनकडून राबवला जातो.**





▸ अमोल मचाले
feedback@civicmirror.in

समाजाने नाकारलेल्या अथवा समाजाचा रोष असलेल्या एखाद्या सवयीला आपण व्यसन म्हणतो. काही व्यसने अशी असतात की ती करणाऱ्या व्यक्तीची शारीरिक-मानसिक हानी तर होतेच पण त्याचबरोबर इतरांच्या शारीरिक-मानसिक प्रकृतीवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. असेच मानसिक आजारांबद्दलही सांगता येईल. आपले विचार, भावना आणि वर्तन यातील संतुलन बिघडणे म्हणजे मानसिक आजार असे ढोबळपणे म्हणता येईल. मानसिक आजारांमुळे दैनंदिन आयुष्यामध्ये अडथळे येण्याबतच कुटुंबासोबत राहताना तसेच कामाच्या ठिकाणीदेखील संबंधित व्यक्तीला अडचणी येतात. साहजिकच याचा परिणाम त्या व्यक्तीचे कुटुंबीय, कामाच्या निमित्ताने तिच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींवरही याचा नकारात्मक परिणाम होतो. हे टाळण्यासाठी व्यसन, मानसिक आजार याची लागण झालेल्या व्यक्तींना वेळीच उपचार मिळणे, त्यांचे समुपदेशन होणे आवश्यक असते. अशा रुग्णांसोबत संवाद साधून त्याच्याशी कनेक्ट होणे ही ती व्यक्ती आजारातून सावरण्याच्या शक्यतेची पहिली आणि महत्वाची पायरी असते. तिथपासून रुग्णाला पूर्णपणे बरे करून त्याला नव्याने आयुष्य जगण्याचा आत्मविश्वास देण्याचे काम 'मुक्ता चॅरिटेबल फाऊंडेशन' करते.

व्यसन ही फक्त सवय नाही तर हा मेंदूचा एक आजार आहे. कोविडच्या साथीनंतर व्यसनांमध्ये मोठी वाढ झाली असून यामध्ये अमली पदार्थ आणि वर्तणुकीशी संबंधित व्यसने या दोन्हींचा समावेश आहे. परंतु या जुनाट आजाराचे व्यवस्थापन करण्यासाठी सामान्य जनता, प्राथमिक काळजी घेणारे डॉक्टर किंवा मानसिक आरोग्य क्षेत्रातील कर्मचारी यापैकी कोणीही जागरूक नाहीत किंवा प्रशिक्षित नाहीत. या अभावामुळे व्यसनाधीनतेसंबंधी विकार असलेल्या १०० पैकी ७५ लोकांना आवश्यक असलेले उपचार उपलब्ध नाहीत, असे सांगून 'मुक्ता चॅरिटेबल ट्रस्ट'चे संस्थापक-अध्यक्ष डॉ. प्रकाश महाजन म्हणाले, ''कोविडनंतर परिस्थिती अधिक आव्हानात्मक झाली आहे. समाजात व्यसनांबरोबरच मानसिक आजारांचे प्रमाण वाढले आहे. आम्ही आमच्या परीने त्यावर काम करत आहोत. शक्य तेवढी कामाची व्यप्ती वाढवण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही 'मेंटल हेल्थ हेल्पलाईन' सुरू केली आहे. व्यसन, मानसिक आजार यापासून दूर कसे राहता येईल, याची लागण झाल्याचे विविध टप्प्यांवर लक्षात आल्यास त्यातून कसे बाहेर पडावे याबाबत ट्रस्टतर्फे नियमितपणे मार्गदर्शन केले जाते.''

डॉ. महाजन हे ज्येष्ठ त्वचारोगतज्ज्ञ आहेत. वैद्यकीय पेशात असताना सामाजिक बांधिलकी जपण्याच्या भावनेतून तसेच विविध व्यसनांतून लोकांना मुक्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी २००५मध्ये 'मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशन'ची स्थापना केली. डॉ. महाजन आणि त्यांच्या सहकार्यांचे काम मात्र त्यापूर्वीपासूनच सुरू होते. त्यावेळची आठवण सांगताना डॉ. महाजन म्हणाले, ''१९९८-९९सुमारास एचआयव्हीबाबत समाजामध्ये फारशी जागरुकता नव्हती. डॉक्टरदेखील एड्स झालेल्या रुग्णाला हात लावायला घाबरत होते. अशा वेळी डॉक्टरांना मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचे आमच्या लक्षात आले. त्यानुसार आम्ही एड्स झालेल्या रुग्णांना कसे हाताळावे, त्यांच्याशी संवाद कसा साधावा, यावर डॉक्टरांना मार्गदर्शन केले. याचा मोठा फायदा झाला. यानंतर आणखी काही समविचारी लोक आमच्यासोबत जोडले गेले. त्यावेळी आम्ही एड्सबाबत जागृतीपर माहिती देण्यासाठी पुण्यातून 'संवाद' ही हेल्पलाईन सुरू केली. त्याला अल्पावधीतच प्रचंड प्रतिसाद लाभला. नंतर आम्ही बिहारची राजधानी पाटणा येथेही एक हेल्पलाईन सुरू केली. तेथे अद्यापही एचआयव्हीचे रुग्ण लक्षणीयरित्या आढळत असल्याने ही हेल्पलाईन अद्यापही सुरू असून तिची व्याप्ती मोठी आहे. इतर आजार आणि व्यसनांवरही तेथे काम चालते. हे सर्व काम सुरू असताना युवांच्या मानसिक आजारावर मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाईन असायला हवी, हे आम्हाला प्रकर्षाने जाणवायला लागले. कारण, या विषयासंदर्भात येणाऱ्या फोनकॉल्सची संख्या प्रचंड होती. त्यात शिक्षण, नातेसंबंध, करिअर, सेक्स प्रॉब्लेम यांसारख्या विषयांशी संबंधित समस्यांचा उल्लेख असायचा. कोविडनंतर व्यसनांबरोबरच यातही मोठी वाढ झाली आहे. अल्पावधीतच या हेल्पलाईनला मोठा प्रतिसाद मिळत आहे. अर्थातच, ही सेवा मोफत आहे.'' व्यसन, मानसिक आजाराशी संबंधित कोणतीही समस्या असल्यास न संकोचता आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. महाजन यांनी केले.

विविध तज्ज्ञांमार्फत व्यसन समजून घेणे, व्यसनमुक्तीवरील औषधोपचार, बायोसायकोसोशल मॉडेल, दारूचे व्यसन, निकोटिन/ तंबाखूचे व्यसन, वेदनाशामक औषधांचे व्यसन, अमली पदार्थ, उत्तेजके, सिंथेटिक औषधे एनपीएस इत्यादी व्यसने तसेच मानसिक आजार; वर्तणुकीशी संबंधित व्यसने (इंटरनेट, गेम्स, खाणे, अश्लिलता) अशा विविध विषयांवर मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे मार्गदर्शन करण्यात येते. नुकत्याच झालेल्या व्यसनाधिनता आणि औषधोपचार परिषदेतही याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या ट्रस्टतर्फे व्यसनमुक्ती औषधाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रत्यक्ष आणि ऑफलाईन तमसेच ऑनलाइन राबविण्यात आला आहे. वयात येत असलेल्या मुलांसाठी 'स्कूल बियॉन्ड बुक्स' अर्थात 'शाळा पुस्तकांच्या पलीकडे...', एड्सग्रस्त मुलांसाठी 'अंकूर' प्रकल्प, कर्करोग जागरुकतेसाठी 'वुई कॅन' उपक्रमदेखील राबविण्यात आले आहेत. ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. महाजन यांना जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनतर्फे (जीपीए) 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## व्यसनाधिनता आणि औषधोपचार परिषद

मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशनच्या कामाची व्याप्ती एवढीच मर्यादित नाही. मानसिक आजार, व्यसनामुक्ती, लैंगिक शिक्षण या विषयांवर झोकून देत काम करत असलेल्या या ट्रस्टने अलिकडेच 'व्यसनाधिनता आणि औषधोपचार' यावर पुण्यात दीर्घकालीन परिषदेचे संयुक्तपणे आयोजन केले होते. रोटरी क्लब, मुंबई घाटकोपर, रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१४१ अंतर्गत रोटरी फाऊंडेशनच्या ग्लोबल ग्रँट जीजी १७४८१०७ बेल्जियम जिल्हा आयोजित आणि रोटरी क्लब पुणे हवेली, रोटरी क्लब ऑफ अडिक्शन प्रिव्हेन्शन ३१४१ आणि मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या सहकार्याने लोणी काळभोर येथील शिवम हॉस्पिटलमध्ये 'व्यसनाधिनता आणि औषधोपचार' ही परिषद झाली.

व्यसनाधीन व्यक्तींना योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी आवश्यक ते उपचार मिळावे, यासाठी व्यसनमुक्ती आणि त्यावरील उपचार याविषयी मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे रोटरी क्लब आणि इतर संस्थांच्या सहकार्याने मार्गदर्शन सत्र आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम दर वर्षी आयोजित करतात. यंदा परिषदेचे २५ वे वर्ष होते.

तीन आठवड्याच्या या दीर्घकालीन परिषदेमधे मार्गदर्शन आणि इच्छुकांसाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'व्यसनाधिनता आणि औषधोपचार' या विषयावरील अभ्यासक्रम ऑनलाईन तसेच ऑफलाईन स्वरूपात आयोजित करण्यात आला होता. परिषदेत फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. प्रकाश महाजन, डॉ. मधू ठक्कर, डॉ. अविनाश डिसूझा, डॉ. अमर शिंदे, डॉ. हिमांशू पेंडसे, डॉ. स्वप्नील देशमुख, सोनाली काळे, दीपिका पाटील यांनी मार्गदर्शन केले.

व्यसनांचे वाढते प्रमाण, भारतातील सद्यस्थिती आणि डॉक्टरांचा प्रत्यक्ष सहभाग यावर डॉ. ठक्कर यांनी वैज्ञानिक दाखले देऊन आपले विचार व्यक्त केले. तर डॉ. प्रकाश महाजन यांनी व्यसन हा आजार का आहे आणि कशामुळे होतो, व्यसन जडण्याचे टप्पे असे मुद्दे घेऊन त्यावर सविस्तर मार्गदर्शन केले. मुक्ता फाउंडेशनच्या ट्रस्टी डॉ. स्नेहल पाठक आणि डॉ. ज्योती शिंदे आणि घनश्याम ननावरे यांनी याची जबाबदारी सांभाळली. या परिषदेमध्ये डॉक्टर, परिचारिका, मानसोपचार तज्ज्ञ, समुपदेशक, व्यसनमुक्तीसाठी काम करणारे इच्छुक, समाजसेवक, वैद्यकीय शाखेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

## लाईफ स्कील्स शिकविण्यावर भर



शिक्षण, नातेसंबंध, करिअर, सेक्स प्रॉब्लेम यांसारख्या विषयांशी संबंधित समस्या आजच्या तरुणाईला भेडसावत आहेत. व्यसनाधिनता वाढली आहे. कोविडनंतर यात मोठी वाढ झाली आहे. यातून सावरण्यासाठी उपचा, समुपदेशा याबरोबरच लाईफ स्कील्स शिकविण्यावर आमचा भर असतो. कोविडनंतर मानसिक आरोग्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत असल्याचे येणाऱ्या फोनकॉल्सवरून आमच्या लक्षात आले. त्यामुळे याबाबत नि:शुल्क मार्गदर्शन करणारी स्वतंत्र हेल्पलाईन आम्ही सुरू केली आहे. इतरही उपक्रमांच्या माध्यमातून समाजस्वास्थ निकोप राहावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

**- डॉ. प्रकाश महाजन,**
संस्थापक-अध्यक्ष, मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशन

## संवाद वाढवणे हा प्रभावी उपाय



मानसिक समस्या, व्यसन यामुळे समुपदेशानाची गरज कोविडपूर्वीही समाजातील विविध घटकाला होतीच. कोविडनंतर ते प्रमाण लक्षणीयरित्या वाढले आहे. सध्या आपली कुटुंबसंस्था आक्रसत आहे. कौटुंबिक गरज, करिअर म्हणून वडिलांसोबतच आईदेखील जॉब करत असल्याने दोघेही मुलांना पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे मुले आणि आई-वडील यांच्या संवादातील सहजपणा कमी होण्याचाही धोका निर्माण होतो. मला जे मिळाले नाही, ते 'नाही' हे ऐकण्याची सवय मुलांमध्ये राहिलेली नाही. ही मुले मोठी झाली की त्याचा नकारात्मक परिणाम मुलांच्या आयुष्यावर होतो. हे सर्व टाळण्यासाठी उमलत्या वयातील मुलांशी संवाद वाढवायला जावा.

**- डॉ. रुपा अगरवाल,** सचिव, मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशन



**मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशनचे विश्वस्त मंडळ - अध्यक्ष डॉ. प्रकाश महाजन, सचिव डॉ. रुपा अगरवाल, कोषाध्यक्ष अश्विनी शिंदे, विश्वस्त डॉ. अनुराधा तारकुंडे, स्नेहल पाठक, डॉ. ज्योती शिंदे, घनश्याम ननावरे आणि इतर मान्यवर.**



## शाळा पुस्तकांच्या पलीकडे...

आठवी आणि नववीतील मुलांचे भावविश्व गुंतागुंतीचे असते. वयात येऊ पाहणाऱ्या मुला-मुलींना शालय अभ्यासक्रमात न शिकवले जाणारे मात्र जीवन जगण्यासाठी आवश्यक असे लाईफ स्कील्स 'शाळा पुस्तकांच्या पलीकडे' या उपक्रमाद्वारे शिकवले जातात. यात आई-वडिलांबरोबरच मित्र-मैत्रिणींसोबतचे नातेसंबंध याबाबत मुलांना बोलते केले जाते. सेक्स एज्युकेशन, पिअर प्रेशर कसे हाताळावे यासह या मुलांना भेडसावणाऱ्या इतर समस्यांचे निवारण केले जाते. या वयातील मुलांचे आणि मुलींची व्यसने वेगवेगळी असतात. त्याबाबतही जागृती केली जाते.



## मानसिक आरोग्यसेवेसाठी मोफत हेल्पलाइन : ७८८७८८९८८२



भविष्यात मानसिक आरोग्याचा प्रश्न गंभीर होणार असून चारपैकी एका व्यक्तीला या प्रश्नाला सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. या सामाजिक जबाबदारीतील आपला वाटा उचलण्यासाठी 'मुक्ता चॅरिटेबल ट्रस्ट'ने महत्वाचे पाऊल टाकले आहे. समाजातील गरजूंना मानसिक आरोग्यसेवा सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मोफत 'मेंटल हेल्थ हेल्पलाइन' नुकतीच सुरू करण्यात आली आहे. व्यवसाय, नातेसंबंध आणि मनातील कोणत्याही दैनंदिन समस्यांबाबत दर्जेदार, रुग्णांची गुप्तता जपणारे आणि पूर्वग्रहविरहित मानसिक आरोग्य समुपदेशन तज्ज्ञांमार्फत ७८८७८८९८८२ या हेल्पलाइनद्वारे पुरवले जाते. समाजातील असुरक्षित घटक, किशोरवयीन मुले, दीर्घ आजाराने ग्रस्त व्यक्ती, पीडित महिला, एकल पालक, वेश्याव्यवसाय आणि व्यसनाधीनतेशी संघर्ष करणाऱ्या सर्वांसाठी ही सेवा उपयुक्त ठरेल, असा विश्वास 'मुक्ता चॅरिटेबल ट्रस्ट'चे अध्यक्ष डॉ. प्रकाश महाजन आणि सचिव डॉ. रुपा अगरवाल यांनी व्यक्त केला.



# कर्नाटकात ६५ टक्के मतदान शांततेत

## जद( धर्मनिरपेक्ष )शी आघाडीची शक्यता शिवकुमार यांनी फेटाळली

**#बंगळुरु**



मतदानासाठी लागलेल्या रांगा.

भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसने आपली प्रतिष्ठा पणाला लावलेल्या कर्नाटक विधानसभेच्या २२४ जागांसाठी आज सकाळी मतदानाला सुरूवात झाली. सायंकाळी ५ पर्यंत ६५. ७ टक्के मतदान झाले होते. एकूण २,६१५ उमेदवार रिंगणात असून त्यासाठी ५८ हजार ५४५ मतदान केंद्रे उभारलेली आहेत या निवडणुकीत ४२ लाख ४८ हजार २८ नवे मतदार आहेत. एकूण ५ कोटी ३० लाख मतदार आपले नवे लोकप्रतिनिधी निवडणार आहेत. दोन्ही पक्षात असलेली स्पर्धा राज्यभर मतदानात दिसून येत होती. सकाळी काहीशा संथ वेगाने सुरू झालेल्या मतदानाने नंतर मात्र वेग घेतला. बहुतेक ठिकाणी रांगा लागलेल्या होत्या. काही तुरळक अपवाद वगळता राज्यात सर्वत्र शांततेने मतदान जाले. आता साऱ्यांचे लक्ष १३ मे कडे लागले असून त्यादिवशी कोणता पक्ष सत्तेवर येणार ते स्पष्ट होईल. निकालानंतर जनता दल धर्मनिरपेक्ष पक्षाशी कोणतीही आघाडी करण्याची शक्यता कर्नाटक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डी.के.शिवकुमार यांनी फेटाळली.

माजी मुख्यमंत्री बी.एस.येडीयुरप्पा यांना आपल्या शिवमोगा मतदारसंघात सर्वात प्रथम मतदान केले. ते म्हणाले की, राज्यातील ७५ ते ८० टक्के मतदान आमच्या पक्षाच्या बाजूने होईल. आम्हाला स्पष्ट बहुमत मिळेल. मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनीही आपल्या पक्षाला १३५ ते १५० जागा मिळून पूर्ण बहुमत मिळेल असा विश्वास व्यक्त केला. कर्नाटक प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष डी.के.शिवकुमार, माजी मुख्यमंत्री सिद्दरामय्या, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सकाळीच आपल्या मतदार संघात मतदान केले.

निवडणुकीच्या मतदानाला सुरुवात झाल्यावर काँग्रेसचे कर्नाटक प्रदेशाध्यक्ष डी.के.शिवकुमार यांनी निकालानंतर जनता दल धर्मनिरपेक्ष या पक्षाशी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. २०१८ मध्ये निवडणूक निकालानंतर काँग्रेस आणि जनता दल धर्मनिरपेक्ष यांनी आघाडी करत कुमारस्वामी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले होते. मात्र, काही बंडखोर आमदारांनी पक्ष सोडत भारतीय जनता पक्षांशी समझोता केल्याने कुमारस्वामी सरकार कोसळले होते.

शिवकुमार म्हणाले की, जनता दल धर्मनिरपेक्षशी आघाडी करण्याची कोणतीही शक्यता नाही. आम्ही स्वबळावर सरकार स्थापन करणार आहोत. माजी मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांनीही निकालानंतर आपल्या पक्षाला १३० ते १५० जागा मिळणार असल्याचे भाकित वर्तवले. त्यामुळे काँग्रेसला निसटता विजय मिळणार असल्याचेअनेक राजकीय तज्ज्ञांनी व्यक्त केलेले अंदाज खोटे ठरणार असल्याचे सांगितले. २०१८ मध्ये जनता दल धर्मनिरपेक्षला ३७ जागा मिळाल्या होत्या. काँग्रेसला ७८ आणि बारतीय जनता पक्षाला १०४ जागा मिळाल्या होत्या.


शिवकुमार म्हणाले की, महागाईस भ्रष्टाचार, चांगले सरकार, विकास हे या निवडणुकीतील महत्त्वाचे प्रश्न होते. आपल्या गॅस सिलिंडरकडे बघून मतदान करण्याचे आवाहन मी मतदारांना केले होते. आमच्या सर्व नेत्यांना सिलिंडरला हार घालण्यास आम्ही सूचवले होते. मंगळवारी शिवकुमार यांनी सिलिंडरची केलेली पूजा चर्चेत होती. व्हायरल झालेल्या व्हीडीओत शिवकुमार म्हणाले होते की, मतदारांनो मतदानाला जाण्यापूर्वी सिलिंडरची पूजा करण्याचे विसरू नका.



# कुस्ती संघटनेला दिलेला पैसा खेळाडूंना मिळतो का हे तपासा

## विनेश फोगाटचे उद्योजक रतन टाटा यांना आवाहन

**#नवी दिल्ली**



जो पैसा आपण विविध कुस्ती महासंघाला दान करता, तो पैस खेळांडूपर्यंत पोहोचतो की नाही हे सामाजिक उत्तरदायित्व निभावणारे जगप्रसिद्ध उद्योजक रतन टाटा यांनी आवर्जून तपासावे असे आवाहन प्रसिद्ध महिला कुस्तीगीर विनेश फोगाट हिने बुधवारी पत्रकारांशी बोलताना केले. भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि भारतीय जनता पक्षाचे खासदार ब्रिजभूषण शरण सिंग यांना अटक करण्याच्या मागणीसाठी विनेश फोगाट, साक्षी मलिक, बजरंग पुनिया आदी खेळाडू जंतर-मंतरवर आंदोलन करत आहेत. त्यांनी ब्रिजभूषण सिंग यांच्यावर लैंगिक शोषणाचा गंभीर आरोप केला आहे.

पत्रकारांशी बोलताना विनेश म्हणाली की, भारतीय कुस्ती महासंघाला दिला जाणारा पैसा खेळांडूपर्यंत पोहोचतो की नाही हे रतन टाटा यांनी तपासण्याची गरज आहे. आपल्या निर्दोषत्वाची सिंग यांना एवढी खात्री असेल तर त्यांनी नार्को टेस्टला सामोरे जावे, असे आवाहनही साक्षी मलिकने या वेळी दिले. साक्षी म्हणाली की, भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षांनी नार्को टेस्टला सामोरे जावे असे आमचे त्यांना आव्हान आहे. आम्हीसुद्धा अशा चाचणीला सामोरे जाऊ. एकदाच जे काही सत्य असेल ते जनतेसमोर यावे. महासंघाच्या सर्व स्पर्धा भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या नेतृत्वाखाली घ्याव्या. भारतीय कुस्ती महासंघाचे प्रमुख कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यात सहभागी असतील तर अशा स्पर्धांना आमचा विरोध असेल.

ब्रिज भूषण शरण सिंग जोपर्यंत संघटनेत आहे तो पर्यंत कोणत्याही स्पर्धा घेण्यास आमचा विरोध असेल असेही या खेळाडूंनी बजावले. तसेच ब्रिजभूषण विरूद्धची चौकशी जाणूनबुजून अतिशय संथ गतीने सुरू असल्याच्या निषेधार्थ सर्व आंदोलक खेळाडू गुरुवारी काळ्या फिती लावून आपला निषेध नोंदवणार आहेत.

# लोकशाहीत विरोधकांचा आदर केला पाहिजे

## नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत गेहलोट यांचे आवाहन

**#जयपूर**



लोकशाहीत विरोधकांचा आदर केला पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील त्यादिशेने पावले टाकतील असे प्रतिपादन राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोट यांनी केले. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत राज्यातील साडे पाच हजार कोटींच्या विविध विकासकामांचा शुभारंभ बुधवारी झाला. त्यावेळी मोदींच्या समोरच गेहलोट यांनी वरील आवाहन केले. विरोधकांचा आदर केला तर सत्तारूढ आणि विरोधी पक्ष देशाची अधिक ताकदीने आणि निष्ठेने सेवा करतील असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

लोकशाहीमध्ये विविध राजकीय पक्षांमध्ये शत्रूत्व नसते. त्यांच्यातील संघर्ष हा विचारधारांमधील संघर्ष असतो. लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडायचा अधिकार असतो, असेही गेहलोट यावेळी म्हणाले. नेहमीप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर अप्रत्यक्ष हल्ला चढविला. ते म्हणाले की, नकारात्मक दृष्टीकोन बाळगणाऱ्या लोकांच्याकडे विकासाची दूरदृष्टी नसते. त्यामुळे ते निव्वळ राजकीय स्वार्थाकडे पाहत असतात. त्याच्यापुढे त्यांना देशाचा विकास वगैरे काही दिसत नसते. आज राज्यातील साधारण साडेचार हजार कोटींच्या विकास कामाचा माझ्या हस्ते प्रारंभ झाला आहे. या विकास कामांबद्दल मी राज्यातील जनतेचे आभार मानतो. राजस्थानमध्ये आधुनिक आणि मुलभत साधन सुविद्या उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे.

यापूर्वी आवश्यक तेवढी मेडिकल कॉलेज उभारली असती तर राज्यात डॉक्टरांची टंचाई जाणवली नसती. प्रत्येक घराला पाणी दिले असते तर आम्हाला साडेतील लाख कोटींचा जय जीवन योजना सुरू करावी लागली नसती. विरोधी पक्ष आपल्या राजकीय स्वार्थाशिवाय अन्य बाबींकडे लक्ष देत नाहीत. त्यांना विकासाची तशी दृष्टी नसते. विकासकामे वेगाने होण्यासाठी मूलभूत सुविधा आणि आधुनिक साधन सुविधांची गरज आहे.



**हिंसाचाराने होरपळत असलेल्या मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी भारतीय लष्कर आणि आसाम रायफल एकत्रितपणे प्रयत्न करत असून नागा, कुकी आदिवासींमध्ये विश्वास निर्माण व्हावा यासाठी ते घरोघरी भेटी देत आहेत.**

# इम्रान यांना आठ दिवस कोठडी

## तोशीखाना प्रकरणी इम्रान दोषी, माजी परराष्ट्रमंत्री शाह मेहमूद कुरेशी यांना अटक

#इस्लामाबाद



अल् कादिर ट्रस्ट प्रकरणी इम्रान खान यांना राष्ट्रीय उत्तरदायित्व विभागाची आठ दिवसांची कोठडी न्यायालयाने दिली आहे. इम्रान यांचे वकिल अली बुखारी यांनीही माहिती दिली.

दरम्यान, इम्रान यांचे घनिष्ठ सहकारी माजी परराष्ट्रमंत्री शाह मेहमूद कुरेशी यांना इस्लामाबादमध्ये अटक करण्यात आली आहे. इम्रान खान यांना कोठडी दिल्यानंतर कुरेशी यांना अटक करण्यात आली आहे. ७० वर्षांचे इम्रान खान यांच्या अध्यक्षतेखालील तेहरिक-ए.इन्साफ पक्ष सत्तेवर असताना झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल सरकारने कठोर भूमिका घेतली असून कुरेशी यांची अटक त्याचाच एक बाग असल्याचे सांगण्यात येते.कुरेशी यांच्या शिवाय तेहरिक-ए. इन्साफ पक्षाचे सरचिटणीस असद उमर यांनाही ताब्यात घेतले असून ज्येष्ठ नेते फवाद चौधरी यांनाही ताब्यात घेण्यात येणार असल्याचे कळते.

पंतप्रधान काळात परदेश दौऱ्यात असताना मिळालेल्या भेटवस्तू बेकायदेशीर मार्गाने विकल्याबद्दल पाकिस्तानच्या न्यायालयाने माजी पंतप्रधान इम्रानखान यांना दोषी ठरवले आहे. २०१८ ते २०२२ दरम्यान पंतप्रधान असताना इम्रान यांनी विविध देशांना भेटी दिल्या. त्यावेळी पंतप्रधान म्हणून मिळालेल्या आणि सरकारची मालकी असलेल्या भेटवस्तू या तोशीखान्यामध्ये म्हणजे सरकार तिजोरीत जमा होतात. या वस्तूंची बेकायदा विक्री केल्याबद्दल इम्रान यांच्यावर खटला दाखल झालेला आहे. भ्रष्टाचारविरोधी राष्ट्रीय संस्थेच्या आदेशानुसार केंद्रीय निम लष्करी दलाने आणखी एका भ्रष्टाचार प्रकरणात मंगळवारी न्यायालयाबाहेर इम्रान खान यांना अटक केली आहे. त्यांच्या अटकेच्याविरोधात त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी देशभर हिंसक निदर्शने केली. त्याचे पडसाद अजूनही देशभर उमटत आहेत.

एकेकाळी क्रिकेटचे मैदान गाजवणारे इम्रानखान या तोशीखाना प्रकरणाने अडचणीत आले आहेत. पंतप्रधान म्हणून मिळालेल्या भेटवस्तू त्यांनी तोशीखान्यातून सवलतीच्या दरात घेतल्या आणि त्याची विक्री करताना त्यांनी भरपूर नफा मिळवल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. १९७४ मध्ये कायदेशीर तरतुदीनुसार तोशीखान्याची स्थापना झाली आहे. त्याच्यावर मंत्रिमंडळाचे प्रशासकीय नियंत्रण असते. देशाचे पंतप्रधान, मंत्री संसद सदस्य, प्रशासकीय -सनदी अधिकारी जेव्हा विदेश दौऱ्यावर असतात, तेव्हा त्यांना मिळालेल्या भेटवस्तू सरकारच्या मालकीच्या म्हणून तोशीखान्यात जमा केल्या जातात.

इस्लामाबादचे जिल्हा आणि सत्र न्यायाधीश हुमायून दिलावर यांनी निकाल जाहीर केला तेव्हा इम्रान खान न्यायालयात हजर होते. पाकिस्तानच्या जिओ टेलिव्हिजनने इम्रान खान हे न्यायालयासमोर हजर होत असल्याचे दाखवले आहे. यामध्ये इम्रानखान आपल्या हातात कागदपत्रे घेऊन एका खुर्चीत बसलेले पाहावयास मिळते. अल कादिर ट्रस्ट प्रकरणात इम्रान खान यांना १४ दिवस कैदेत ठेवण्याचा आदेश न्यायालय देण्याची शक्यता आहे. खान यांना अटक झाल्यावर देशभर विविध ठिकाणी हिंसक आंदोलने झाली आहेत. त्यांच्या समर्थकांनी लष्करांच्या तळावर, इमारतींवर हल्ले केल्याने देशभर अस्वस्थता आणि अशांतता निर्माण झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले होते. त्यामुळे सरकारला पंजाबमध्ये काही ठिकाणी लष्कराला बोलवावे लागले होते.

## ब्रिटनमध्ये दोन कुत्र्यांना गोळ्या घातल्या

#लंडन



पूर्व लंडनमधील पोप्लार भागात कुत्र्याने हल्ला केल्याचा दूरध्वनी आल्यानंतर मेट्रो पोलिसांनी दोन कुत्र्यांना गोळ्या घालून ठार मारले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुासर एका महिलेवर कुत्र्यांनी हल्ला केल्याचा फोन आला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन कुत्र्यांना शॉक देऊन नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याला गोळ्या घालण्यात आला. या घटनेचा व्हीडीओ व्हायरल झाला असून त्यात पोलिसांच्याजवळ प्राणी पकडण्याची काठी, दंगल प्रतिबंधक शिल्ड दिसत आहे.

यावेळी पोलीस एका व्यक्तीशी संवाद साधताना दिसत होते. त्याला त्यांनी शरणागती पत्करण्याचे आवाहन केले होते. त्याच्याकडे इलेक्ट्रीक गन होती. त्यानंतर काही काळाने कुत्र्यांनी पोलिसांच्या दिशेने दाव घेण्याचा प्रयत्न केला असता गोळ्या घालण्यात आल्याचे दिसते. त्यानंतर त्या व्यक्तीला अटक करण्यात आली असून त्याच्यावर कुत्र्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप ठेवला आहे.

घटनास्थळी गेलेल्या पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तेथील कुत्री खूप आक्रमक आणि हिंसक झालेली होती. त्याच्यापासून पोलिसांना धोका निर्माण झाल्याचे दिसत होते. कुत्रा नियत्रंणाखाली गेल्याबद्दल आणि पोलिसांवर हल्ला करत असल्याबद्दल त्या व्यक्तीला अटक केली आहे. पोलिसांच्या कृतीचे समर्थन करण्यात आले असून असे निर्णय घेणे सोपे नसते. मात्र, वेळप्रसंगी असे निर्णय घ्यावे लागतात, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गोळ्या घातलेल्या कुत्र्यांची विल्हेवाट लावण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.




## आणखी सात जणांना इराणमध्ये फासावर चढवले

### बारा दिवसांत ६४ लोकांना फाशी दिल्याचा दावा

#पॅरीस

तेहरान शहराच्या बाहेर दोन तुरुंगातील आणखी सातजणांना फाशी देण्यात आली आहे. अंमली पदार्थांचा वापर आणि बलात्काराबद्दल ही शिक्षा ठोठावण्यात आली आहे. गेल्या दोन आठवड्यात तेहरानमध्ये फाशी दिल्याच्या घटनेत वाढ झाली आहे. बारा दिवसांत ६४ लोकांना फाशी दिल्याचा दावा नॉर्वेतून काम करणाऱ्या इराण मानव अधिकार संघटनेने केला आहे.

धार्मिक विद्वेष पसरविल्याबद्दल मंगळवारी इराण सरकारने दोघांना फाशी दिली होती. गेल्या काही महिन्यांत इराणमध्ये फाशी देण्याच्या घटनेत मोठी वाढ होत असल्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनी चिंता व्यक्त केली आहे.

तेहरानच्या बाहेर असलेल्या गेझल हेसार तुरुंगात तीन व्यक्तींना फासावर चढविण्यात आल्याचे नॉर्वेतून काम करत असलेल्या इराण मानवी अधिकार या स्वंयसेवी संघटनेने सांगितले. याबद्दल मिझान ऑनलाईन संघटनेने दिलेल्या माहितीनुसार त्यांच्यावर अंमली पदार्थाच्या व्यापाराचा आरोप होता.

काराज बागातील राजाई शाहर तुरुंगातील चार जणांना फाशी देण्यात आली. त्यांच्यावर बलात्काराचे आरोप होते. मात्र, या घटनेची पुष्टी होऊ शकलेली नाही. इराण मानवी अधिकार या संघटनेने दिलेल्या माहितीनुसार गेल्या बारा दिवसांत ६४ जणांना फाशी दिलेली आहे. समाजात सर्वाधिक दुर्बल असणाऱ्या नागरिकांना दोषी ठरवून त्यांना जगातून नष्ट करण्याचे काम सरकारने हाती घेतली असून त्यासाठी फासावर चढवण्याची यंत्रणा कामाला लावली आहे.



संघर्षाने ग्रस्त असलेल्या सुदानमधील पेच कायम असून राजधानी कार्टुममध्ये लुटालूट, इमारतींचे नुकसान, वीज आणि पाणी समस्या कायम आहेत. गोळीबारांच्या घटनांमुळे नागरिक शहरात सैरावैरा धावत आसरा शोधण्याचा प्रयत्न करत आहेत



# काममंत्र



**डॉ. रोहन जहागिरदार**

सेक्सपर्ट आणि मानसोपचारतज्ज्ञ

**१ माझे एका मुलावर प्रेम आहे. त्यालाही मी आवडते. आमच्यात पहिल्यांदाच शरीरसंबंध प्रस्थापित झाले. मात्र, त्यानंतर आता २ दिवस उलटून गेले, तरी त्याचा मला एकही फोन आलेला नाही. असं का झालं असेल? माझ्या मनात खूप चित्र-विचित्र विचार येत आहेत. मी काय करू?**

– दोन दिवस हा तसा खूप मोठा कालावधी नाही. त्यामुळे तुम्ही कोणताही निष्कर्ष काढण्याची घाई करू नका. तुम्ही म्हणता त्या प्रमाणे तुमच्यात असं काही पहिल्यांदाच झालं असेल, तर तुमचा प्रियकरही ही गोष्ट शांतपणे घेत असेल. पुरुषाला अशा गोष्टी पचवायला वेळ लागत नाही, असं आपल्याला वाटतं. मात्र, असं नसतं. त्यामुळे कदाचित तोही विचार करत असेल. तुम्ही अजून थोडा काळ वाट बघा आणि त्यानंतर मात्र स्पष्टपणे विचारा. बोलल्याने तिढा सुटेल.

**२ मी २२ वर्षांचा आहे. लिंगाची लांबी वाढावी यासाठी मी दोन महिन्यांपासून गोळ्या घेत आहेत. मात्र, त्यामुळे केवळ एक सेमी लांबी वाढल्याचं माझ्या लक्षात आले. मी त्या गोळ्या घेणे सुरू ठेवू का?**

– कृपया अशा प्रकारची कोणतीही औषधे स्वतःच्या मनाप्रमाणे घेऊ नका. ताबडतोब त्या गोळ्या घेणे थांबवा. त्याचा परिणाम तुमच्या आरोग्यावर होऊ शकता. लिंगाची लांबी ही गोष्ट तितकीशी महत्त्वाची नसते. तुम्हाला जर अन्य एखादी लैंगिक समस्या भेडसावत असेल, तर डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घ्या.

**३ मी ४२ वर्षांची महिला आहे. मला संततीनियमनाच्या गोळ्या घ्यायची अजिबात इच्छा नाही. गर्भधारणा रोखण्यासाठी आणखी कोणते पर्याय उपलब्ध आहेत?**

– संततीनियमनासाठी खूप महिला गोळ्या घेतात. अनेकांना तो सुरक्षित पर्याय वाटतो. मात्र, त्याचा आरोग्यावर विपरित परिणाम होत असतो. त्यामुळे वयाच्या कोणत्या टप्प्यापर्यंत त्या गोळ्या घ्याव्यात, याला मर्यादा आहे. शस्त्रक्रिया करून घेणे, हाही एक पर्याय आहे. त्याच बरोबर शरीरसंबंधांवेळी निरोध वापरणं हादेखील अत्यंत सोपा पर्याय आहे. याशिवाय तुम्ही डॉक्टरांशी चर्चा करून आणखी काही पर्यायांचा विचार करू शकता.


**४ मी एक तरुणी असून, मी आणि माझा जोडीदार एकमेकांपासून लांब राहतो. त्यामुळे आम्ही अनेकदा 'व्हर्च्युअली' (आभासी) सेक्सबाबत बोलतो. मात्र, असे करतानादेखील तो निरोध वापरतो. तो असे का करत असेल? मला काळजी वाटत आहे.**

– तो असे का करत असेल, याचे उत्तर देणे कठीण आहे. सामान्यतः लोक असे करतात की, नाही यावरही बोलता येणे अवघड आहे. मात्र, तुम्हाला त्याच्या वागण्यात आणखी काही विचित्र गोष्टी आढळल्या, तर तुम्ही त्याच्याशी स्पष्ट बोला आणि चर्चेने प्रश्न सोडवा. कदाचित तो जे करतो आहे, ते करण्याची आवश्यकता आभासी पद्धतीमध्ये नसते, याची जाणीव त्याला कोणी तरी करून देण्याची गरज असेल.

**लैंगिक समस्यांबाबत आपल्या प्रश्नांसाठी-**
sexpert@punemirror.com

# कुठे कुठे, काय काय ?

## 'मधुर सुरांतून चित्र बोलते'



भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत चित्रकला व शास्त्रीय संगीत या दोन कलांची एकत्र गुंफण असलेल्या 'मधुर सुरांतून चित्र बोलते' या भाग्यश्री गोडबोले यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत त्यांनी चितारलेल्या राधाकृष्णाच्या लघुचित्रांचे प्रदर्शन आणि त्या चित्रांवरील त्यांच्या स्वरचित शास्त्रीय संगीतातील बंदिशींचे सादरीकरण रसिकांना अनुभवता येणार आहे. आविष्कार क्रिएशन्स्, पुणे यांनी या कार्यक्रमाची निर्मिती केली आहे.

- कुठे : भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह, सेनापती बापट रस्ता
- कधी : १३ मे, संध्या ५:३० वाजता., मुक्त प्रवेश

## चारचौघी



स्त्रियांची मते, त्यांचे निर्णय याचे सखोल दर्शन घडवणारे 'चारचौघी' हे नाटक ३१ वर्षांनंतर पुन्हा एकदा रंगभूमीवर आले आहे. चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'चारचौघी' नाटकात रोहिणी हट्टंगडी, कादंबरी कदम, पर्ण पेठे, निनाद लिमये, श्रेयस राजे, पार्थ केतकर आणि मुक्ता बर्वे महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. 'जिगीषा'ने नाटकाची निर्मिती केली आहे. तर, प्रशांत दळवी यांनी नाटकाचे लेखन केले आहे. अशोक पत्की यांनी नाटकाला संगीत दिले असून, संदेश बेंद्रे यांनी नेपथ्याची धुरा सांभाळली आहे.

- **कुठे** : बालगंधर्व रंगमंदिर, पुणे.
- **कधी** : १३ मे, रात्री ९:३० वाजता.
- **शुल्क** : ३०० रुपये व त्यापुढे.

## संज्या छाया



सहकुटुंब, सहपरिवार बघण्यासारखं हे नाटक वृद्धांना तरुणासारखं जगण्याचा मंत्र देतं आहे आणि तरुण मंडळीसाठी येणाऱ्या काळात कसं वागावं याची गुरुकिल्ली देतं. प्रशांत दळवी लिखित आणि चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'संज्या छाया' या नाटकात रसिक प्रेक्षकांना भरभरून देण्यासारखं बरंच काही आहे. वैभव मांगले आणि निर्मिती सावंत यांच्या अभिनयाने हे नाटक एका उंचीवर गेलं आहे.

- **कुठे** : बालगंधर्व रंगमंदिर, पुणे.
- **कधी** : १२ मे, संध्या ५ वाजता.
- **शुल्क** : ३०० रु. व त्यापुढे.

## 'प्रतिमा उत्कट' रंगकथा



ज्ञान प्रबोधिनी प्रशाला माजी विद्यार्थी मंडळाच्या कला आणि संस्कृती विशेष उद्दिष्ट गटाच्या वतीने 'प्रतिमा उत्कट – रंगकथा २३' या चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात चित्र मांडण्यासाठी कलाकारांनी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. कलाकारांनी स्वतः केलेले पेंटींग, लॅण्डस्केप, पोट्रेट, वाईल्ड लाईफ, स्थिरचित्र, निसर्गचित्रांचा समावेश करता येणार आहे. त्यासाठी १५ मे पर्यंत https://forms.gle/oKMCZVCFeEjsqLYV7 गुगल फॉर्मवर नोंदणी करावी, किंवा ९५७९९००१२९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

- **कुठे** : बालगंधर्व कलादालन, पुणे.
- **कधी** : ८ ते ११ जून दरम्यान, **मुक्त प्रवेश**

# 'द केरला स्टोरी' चित्रपट विनामूल्य दाखवणे चुकीचे



शाहीर साबळे यांच्या जीवनावरील चित्रपट चांगल्या प्रकारे सुरू असताना 'द केरला स्टोरी' हा सिनेमा विनामूल्य दाखवला जाणे चुकीचे आहे, अशा शब्दांत शिरूरचे राष्ट्रवादीचे खासदार, अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांनी टीका केली. चिंचवड येथील एका खासगी कार्यक्रमात डॉ. कोल्हे बोलत होते. सध्या 'द केरला स्टोरी' हा चित्रपट गाजत आहे. 'लव्ह जिहाद' या विषयावर असलेला हा चित्रपट भाजपच्या नेत्यांकडून प्रेक्षकांना विनामूल्य दाखवला जात आहे. या अनुषंगाने डॉ. कोल्हे यांनी टीका केली.

डॉ. कोल्हे म्हणाले की," कलाक्षेत्रातून राजकारणात आल्यानंतर निवडून आलेला मी पहिला मराठी कलाकार आहे. हे महाराष्ट्रातील मतदारांना नवीन आहे. तुमच्या खासदाराचे उत्पन्नाचे साधन काय आहे, याचा विचार केला जात नाही. यासाठी राजकीय साक्षरता आवश्यक आहे. तुमचा "गोविंदा" होऊ देऊ नका, असे मला सुरुवातीला सांगणारे आता दूरध्वनी करून शाबासकी आणि शुभेच्छा देतात. थिएटर आणि शो मिळत नाही म्हणून टीडीएम या मराठी चित्रपटातील कलावंतांना अश्रू अनावर झाले, अशी वेळ येणे दुर्दवी गोष्ट आहे.'

'नितीन गडकरी यांनी शिरूर मतदारसंघात रस्तेविकासासाठी भरघोस निधी दिला. राजकारणात शिवराळ भाषा वापरणाऱ्यांना मतदार नाकारतात. पिंपरी-चिंचवड शहराप्रमाणेच १३ राज्यात रेड झोनची समस्या आहे. बैलगाडा शर्यत केवळ नाद नाही, तर देशी गोवंशाचे रक्षण आहे. मतदारसंघात संपर्क कमी आहे, हे मान्य. मात्र, विकासकामांसाठी आवश्यक पाठपुरावा सुरू,' असे डॉ. कोल्हे यांनी सांगितले.



# '५६ इंच छाती असलेले सेल्फी किंग कुठे आहेत?'

दक्षिण आफ्रिकेतून मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात ठेवलेल्या चित्त्यांपैकी आणखी एकाचा चित्त्याचा मृत्यू झाला आहे. मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात आणलेल्या चित्त्यांमध्ये झालेल्या झुंजीत 'दक्षा' या मादी चित्त्याचा मृत्यू झाला आहे. 'दक्षा'सह आतापर्यंत तीन चित्त्यांचा मृत्यू झाला आहे. आता या प्रकरणावरुन अभिनेते प्रकाश राज यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे.

प्रकाश राज सोशल मीडियावर कायमच सक्रिय असतात. नुकतेच त्यांनी ट्विटरवर एक ट्वीट केले आहे. यात त्यांनी अप्रत्यक्षरित्या पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे. प्रकाश राज यांनी एएनआय या वृत्तसंस्थेचे एक ट्वीट रिट्वीट करत मोदींना सवाल विचारला आहे.

"५६ इंचाची छाती असणारे सेल्फी किंग आता कुठे आहेत, ज्यांनी या चित्त्यांना इथे आणण्याचे क्रेडिट घेतले होते", असे ट्वीट प्रकाश राज यांनी केले आहे. या ट्वीटबरोबर त्यांनी 'सहजच विचारतोय', असा हॅशटॅगही पोस्ट केला आहे.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेतील नामिबियातून मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात २० चित्ते आणले गेले होते. यातील तीन चित्त्यांचा आतापर्यंत मृत्यू झाला होता. सर्वात पहिल्यांदा 'साशा' या मादी चित्त्याचा २७ मार्च रोजी मूत्रपिंडाच्या आजाराने मृत्यू झाला होता. तर, 'उदय' हा चित्ता २३ एप्रिलला निश्चल अवस्थेत आढळून आला होता. त्यानंतर त्याचाही मृत्यू झाला. त्याच मंगळवारी 'दक्षा' या मादी चित्त्याचा मृत्यू झाला. नर 'वायु', 'फिंडा' आणि 'अग्नि' या चित्त्यांची मादी 'दक्षा'बरोबर झुंज झाली. या झुंजीत 'दक्षा' गंभीर जखमी झाली होती. यानंतर 'दक्षा'चा मृत्यू झाला आहे. यामुळे आता कुनो उद्यानात २० पैकी १७ चित्ते उरले आहेत.



# श्रद्धाचा नवा लूक



बॉलीवूडच्या सध्याच्या लोकप्रिय अभिनेत्रींमध्ये श्रद्धा कपूरच्या नावाचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. आपल्या अभिनयाच्या जोरावर चाहत्यांच्या हृदयात स्थान मिळवणारी श्रद्धा स्टाईल आणि फॅशनबाबतही अतिशय सक्रिय असते. नवनव्या फॅशनचा प्रयोग करण्यात आघाडीवर असणाऱ्या श्रद्धाने बुधवारी सोशल मीडियावर आपला नवा लूक शेअर केला आहे. श्रद्धाने नुकताच नवा हेअर कट केला असून त्यातही ती नेहमीप्रमाणे अतिशय सुंदर दिसते. हेअर कटचा हा नवा अवतार सोशल मीडियावर शेअर करण्यापूर्वी या नव्या अवतारात तीने बॅकस्ट्रीट बॉईजच्या मुंबईतील कार्यक्रमात भाग घेतला होता.

श्रद्धाच्या या नव्या हेअरकटने तिचे चाहते खूपच इम्प्रेस झाले आहेत. श्रद्धाने आपल्या नव्या हेअर कटच्या लूकचे काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत. यातील एका फोटोमध्ये श्रद्धाने गुलाबी रंगाचा टी शर्ट, डेनीम जीन आणि पांढरे स्नीकर घातलेले आहेत. आपल्या घरातील मोकळ्या वातावरणात श्रद्धा आपल्या नव्या हेअर कटचे फोटो मोठ्या कौतुकाने शेअर करत आहे. या फोटोला कॅप्शन देताना ती म्हणते की, दिल छोटा ना करो, बाल करो. हे फोटो व्हायरल झाल्या झाल्या चाहत्यांनी त्यावर कमेंट करण्यास सुरुवात केली आहे. एक चाहता म्हणतो की, तसे बघायला गेले तर छोटे केस ही आजकालचा फॅशन बनत चालली आहे. ते आता सर्वांना आवडत आहेत. त्यातच सर्वाधिक आवडीच्या तरुणीने असे केस छोटे केले तर मग काय विचारायला नको. दुसरा चाहता म्हणतो की, नव्या प्रोजेक्टसाठीचा हा नवा लूक आहे का ? अनेकांनी तिला नियमितपणे पोस्ट टाकण्यास सुचवले आहे. एक चाहता म्हणतो की, आपण इन्स्टाग्रामवर असल्याची अखेर तुला आठवण झाली हे नशिब. अनेक चाहत्यांनी रेड हार्ट आणि वैशिष्ट्यपूर्ण इमोजी टाकल्या आहेत.

नुकताच श्रद्धाचा तु झुटी मै मक्कार हा रणबीरबरोबरचा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. त्यावरही काही चाहते प्रतिक्रिया देताना दिसतात. या दोघाचा एकत्रितपणे काम केलेला हा पहिला चित्रपट. या चित्रपटात बोनी कपूर, डिंपल कपाडिया आमि अनुभव सिंग बस्सी यांच्या मुख्य भूमिका असून चित्रपटाने बॉक्स ऑफीसवर चांगला धंदा केला आहे. स्त्री २ हा तिचा आगामी चित्रपट लवकरच भेटीला येणार असून त्यात तिच्यासमवेत राजकुमार राव हा तिचा नायक आहे. नागिन आणि चालबाज हे दोन चित्रपटही पाईपलाईनमध्ये आहेत.

# रेनीचे कौतुक !





अभिनेत्री सुश्मिता सेन सोशल मीडियावर नेहमी अलिसाह आणि रेनी सेन या आपल्या मुलींचे कौतुक करत असते. बुधवारी सुश्मिताने आपल्या इन्स्टाग्रामच्या खात्यावर रेनीचा एक व्हीडीओ शेअर केला आहे. अडलीचे गाजलेले 'सेट फायर टू द रेन' हे गाणे रेनीने या व्हीडीओत आपल्या आवाजात गायले केले आहे. यामुळे सुश्मिताने आपल्या लेकीच्या आवाजाची आईच्या मायेने प्रशंसा केली आहे. रेनीच्या या व्हीडीओबरोबर सुश्मिताने आपल्या लेकीच्या आवाजाबद्दल आपणांला काय वाटते ते ही मोजक्या शब्दात मांडले आहे.

व्हीडीओ शेअर करताना सुश्मिता म्हणते की, मला मा या आवाजात हाक मारणाऱ्या पहिल्या शब्दापासून रेनीने गायलेले अडलीचे ते लोकप्रिय गाणे अतिशय सुंदर आवाजात व्हीडीओतून आपल्या समोर येते. रेनीचा आवाज एकाद्या परीसारखा नाजूक आणि ऐकणाऱ्याच्या मनाचा ताबा घेणारा आहे. सो प्राऊड ऑफ यू शोना @रेनीसेन४७.

व्हीडीओ शेअर केल्यावर रेनीने आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. रेनी म्हणते की, आय लव्ह यू मा. मी तुझ्यासाठी हे गाणे गायिले तेव्हा मला खूप आनंद वाटला. सुश्मिताच्या चाहत्यांनीही रेनीच्या आवाजाचे कोतुक केले आहे. एक चाहता म्हणतो की, रेनीकडे तुझे हास्य आहे, त्याची जादू वाढतच चालली आहे. दुसरा चाहता म्हणतो की, रेनीचा आवाजा ऐकून मी खूपच भारावून गेलो, खरोखर परीसारखा सुंदर आवाज. आणखी एक चाहता म्हणतो की, तुझे सौंदर्य आणि व्यक्तिमत्त्व रेनीमधून जाणवते. रेनीचा आवाज एवढा सुंदर आहे की ऐकणारा गाण्यातले शब्द आणि संगीताबरोबर वाहत जातो.

मंगळवारी रेनीने आपल्या व्हीडीओ हॅण्डलवर कव्हर टाकले आणि मा आपली सर्वात मोठी शक्ती असल्याचे सांगत सुश्मिताचे आभार मानले. ती म्हणते की, खूप काळापासून मला सर्वाधिक आवडणाऱ्या गाण्यात याचा समावेश होतो. अडली म्हणजे एक जादू आहे आणि तिचे गाणे गाण्याने खूप आनंद होतो. हा माझा प्रयत्न तुम्हाला नक्की आवडेल.

सुश्मिता सध्या आर्या ३ च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. हृदयविकाराच्या झटक्यातून सावरल्यानंतर तिने आता कामाला सुरुवात केली आहे. आर्याचे शूटिंग सुरू असतानाच सुश्मिताला हृदटविकाराचा झटका आला होता. याची बातमी तीनेच सोशल मीडियावर शेअर केल्यानंतर चाहत्यांना जबर झटका बसला होता.

# अजितकुमारची वर्ल्ड टूर नोव्हेंबरमध्ये



साऊथ इंडियन फिल्म इंडस्ट्रीमधील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्यांच्या यादीत समावेश असलेल्या अजितकुमारची पुन्हा नव्याने ओळख करून देण्याची गरज नाही. सर्वात मिळून-मिसळून राहणारा अजितकुमार चाहत्यांतही खूप लोकप्रिय आहे. लोकांच्या नजरेपासून नेहमी दूर राहण्याचा प्रयत्न अजितकुमार करत असला तरी त्याच्या दयाळु आणि सहनशील स्वभावामुळे तो चर्चेत असतो. मोटारसायकल चालवणे हा त्याचा आवडीचा छंद आहे. मोटारसायकलवरून नवनव्या जागी प्रवास करणे त्याला खूप आवडते. गेल्या सप्टेंबरमध्ये अजितकुमार मोटारसायकलवरून वर्ल्ड टूरवर रवाना झाला होता. मोटारसायकलवरील अजितकुमार अनेक शहरात दिसून आला होता. कित्येक चाहत्याबरोबर त्याने फोटोही काढले होते. त्या पहिल्या टप्प्यातील अजितकुमारचे फोटो आणि व्हीडीओची सोशल मीडियावर जोरदार चर्चा झाली होती. या वर्ल्ड टूरचा उद्देश हा परस्पराबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी मोटारसायकल चालवणे हा होता. अजितकुमारने या टप्प्यात देशातील अनेक राज्यांना भेट दिली. या वेळी काही भागात त्याच्यासमवेत अभिनेत्री मंजू वारियर होती. डिसेंबरअखेर त्याने देशातील जवळ जवळ सर्व राज्यांना भेट दिली होती.

अजितकुमार सोशल मीडियावर सक्रिय नसल्याने त्याचा व्यवस्थापक आणि पीआरओ त्याच्याबद्दलची माहिती चाहत्यांना देत असतात. मंगळवारी त्याच्या पीआरओने सांगितले की अजितकुमारने आतापर्यंत भारत, नेपाळ आणि भूतानला भेट दिली आहे. वर्ल्ड टूरचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. या वर्ल्ड टूरचा पुढील टप्पा आता नोव्हेंबर २०२३ मध्ये सुरू होणार आहे.

विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अजितकुमार लवकरच मागिझ थिरुमेनी दिग्दर्शित करत असलेल्या विदा मयुराची चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करणार आहे. लायका प्रॉडक्शन या चित्रपटाची निर्मिती करत असून ऑक्टोबरपर्यंत या चित्रपटाचे शूटिंग संपेल. हा अजितकुमारचा ६२ वा चित्रपट आहे. त्याचे शूटिंग झाल्यावर अजितकुमार वर्ल्ड टूरच्या पुढील टप्प्यास प्रारंभ करेल.

# शब्दखेळ

## क्रमांक : २९५

- सुभाष पानसे

## आडवे शब्द

१) कोकणात होणाऱ्या रिफायनरीचे गाव. ३) मृताला जिवंत करणारा मंत्र. ६) श्रीरामाची आदर्श राज्यपद्धती. ९) अस्वल. १०) मेहेरबानी. ११) सरस्वतीचे उपासक, ब्राह्मणातील एक जात. १३) मज्जाव, बंदी. १४) तंबूची कापडी भिंत. १६) स्थिती, गत. १८) कागदाचे एक परिमाण. १९) अपमान. २०) तापापूर्वीचे अंग मोडून येणे. २२) येशू ख्रिस्त. २४) यथाशास्त्र. २७) चीर, भेग. २९) बोलणारा. ३१) समजणे, माहिती होणे. ३२) दाराबाहेरचे पाय पुसण्याचे साधन. ३४) कारण. ३५) वाटलेली पातळ भांग. ३६) एक ज्वालाग्रही पदार्थ. ३७) बाण. ३८) घाबरून अनेकांचे पळणे. ४०) अभिप्राय. ४१) पूर्व दिशा. ४२) हिंमत, धैर्य. ४३) सोन्याचा कस, स्पर्श (इं). ४४) जाईची एक जात. ४८) पंख, दुसरा. ५०) बातमी देणे, दुसऱ्यास सांगणे. ५२) क्रिकेटमधील एल. बी. डब्ल्यू (म). ५३) निळा रंग. ५४) देव-देवतांचा ठसा असलेला पूजेतील चांदीचा पत्रा. ५५) मोठा जाड हातोडा. ५६) महिना. ५७) हिरा. ५९) वहीत मोकळी सोडलेली उभी जागा. ६१) पौराणिक कहाणी. ६३) चाल, रूढी. ६४) सावकाश (इं.). ६५) टीपांसहित. ६७) न्यायालयातील दावा. ६९) अतिथी. ७२) डोळ्याचे दान. आंधळ्या व्यक्तीस डोळे देणे. ७४) लुगडे, पातळ. ७५) भिन्न भिन्न मते. ७६) ताकाला फोडणी दिलेले कालवण. ७७) मुख.

## उभे शब्द

१) लहानसहान. २) जिव्हा, ३) वर्तमानपत्राचा मुख्य, अग्रलेख लिहिणारा. ४) व्रत. ५) मेघ, ढग. ६) रात्र. ७) गावठी आंब्याची एक जात. ८) स्त्रिया (हिं). १२) महागाईच्या विरुद्ध. १३) अतिशय मऊ, मुलायम कापड प्रकार. १५) त्रासणे, थकणे, शिणणे. १७) सरकारी. २१) माळ, हार. २३) स्वच्छ. २५) शिव्याशाप. २६) उखळातील लाकडी बत्ता. २८) रेशमाचे जाडसर कापड. २९) भयामुळे जीभ आखडल्यामुळे तोंडातून शब्दोच्चार न निघण्याची स्थिती. ३०) नव्वद अंशाचा कोन. ३२) सपाट दगड, वरवंट्याचा जोडीदार. ३३) प्राचीन. ३५) घोटाळा, एक पालेभाजी. ३७) इंद्राची पत्नी. ३९) बेचव, नीरस. ४०) सहाय्यक, मदत करणारा. ४१) जीव. ४५) वर्षभर उत्पन्न देणारे (पीक वगैरे). ४६) बांबू. ४७) उपासना करणारा. ४९) निमग्न, रममाण. ५०) जेमतेम, भारी ओढाताण करून. ५१) वेळेचा कमीतकमी भाग. ५५) घरोबा, जवळचे संबंध. ५६) डोके, डोंगराचा वरचा भाग. ५८) आवड, द्रव पदार्थ. ६०) लोणी (हिं.). ६२) थापा मारणारी. ६३) नमस्कार. ६६) छापील निवेदन, जाहीरनामा. ६८) काष्ठ, ७०) यज्ञ. ७१) गेलेले, स्थिती. ७३) हनुवटीवरील केस.

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | | ■ | ८ |
| ९ | | ■ | १० | | ■ | ११ | | १२ | | ■ | | ■ | १३ | |
| १४ | | १५ | ■ | १६ | १७ | ■ | १८ | | ■ | १९ | | | | |
| | ■ | २० | २१ | | | | ■ | २२ | २३ | ■ | | ■ | | ■ |
| २४ | २५ | | | ■ | | ■ | २६ | ■ | २७ | २८ | ■ | २९ | | ३० |
| ३१ | | | ■ | ३२ | | ३३ | | | ■ | ३४ | | | ■ | |
| ■ | | ■ | ३५ | | ■ | ३६ | | ■ | ३७ | | ■ | | ■ | |
| ३८ | | ३९ | | ■ | ४० | | ■ | ४१ | | ■ | ४२ | | | |
| ■ | ४३ | | ■ | ४४ | | | ४५ | | ■ | ४६ | ■ | | ■ | ■ |
| ४७ | ■ | ४८ | ४९ | ■ | | ■ | | ■ | ५० | | | | ■ | ५१ |
| ५२ | | | | ■ | ५३ | | | ■ | ५४ | | ■ | ■ | ५५ | |
| | ■ | | ■ | ५६ | | ■ | ५७ | ५८ | | ■ | ५९ | ६० | | ■ |
| ६१ | ६२ | ■ | ६३ | | ■ | ६४ | ■ | ६५ | | ६६ | ■ | ६७ | | ६८ |
| ■ | ६९ | | | ■ | ७० | ■ | ७१ | ■ | ७२ | | ७३ | | ■ | |
| ७४ | | ■ | ७५ | | | | | | ■ | ७६ | | ■ | ७७ | |

## शब्दखेळ २९४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मु | ळा | मु | ढा | ■ | म | हा | न | ग | र | पा | लि | का | ■ | आ |
| द्वा | ■ | रं | ■ | सं | हा | र | ■ | प | हा | रा | ■ | का | ळी | ज |
| म | ल | बा | र | ■ | गा | क | र | ■ | ट | ■ | हे | म | ■ | न्म |
| ■ | क्ष्मी | ■ | स | म | ई | ■ | य | क्ष्मा | ■ | ला | वा | ला | वी | ■ |
| अ | ना | थ | ■ | णी | ■ | ता | त | ■ | स | य | ■ | वा | र | स |
| सा | रा | ■ | अ | पू | र्वा | ई | ■ | का | ■ | क | व | च | ■ | व |
| ■ | य | दा | ■ | र | ■ | त | प | की | र | ■ | न | वा | ग | त |
| वी | णा | ■ | सा | ■ | टा | ■ | ख | ■ | वा | न | वा | ■ | ड | ■ |
| ■ | चा | णा | क्ष | ■ | को | त | वा | ल | ■ | व | स | न | वा | त |
| ■ | जो | ■ | र | पा | टा | ■ | ज | ह | री | ला | ■ | फा | ■ | या |
| ख | डा | वा | ■ | प | क | ड | ■ | र | ■ | ई | द | ■ | वा | र |
| र्च | ■ | टो | च | णी | ■ | ब | रो | ब | री | ■ | ला | लू | च | ■ |
| ■ | का | ळा | ■ | ■ | आ | ड | ■ | ह | त | ब | ल | ■ | नी | र |
| सां | ज | ■ | ऐ | सा | ■ | ब | ख | र | ■ | द | ■ | वा | य | स |
| ■ | वा | र्ध | क्य | ■ | गा | णे | ■ | ■ | ध | न | ग | र | ■ | ना |

■ कडक उन्हाळ्यात साखरेला पाणी सुटते. त्यामुळे ओल येऊन साखर खराब होण्याचा धोका असतो. अशा वेळी साखरेच्या डब्यात ५-६ लवंग घालून ठेवाव्यात. यामुळे साखरेला मुंग्याही लागत नाहीत.

■ लवंग खूप गुणकारी पदार्थ आहे. मळमळ होत असल्यास लवंग तोंडात ठेवावी. त्यामुळे तोंडाला चव येते आणि बरं वाटतं. लवंगाच्या तेलाने सर्दी, खोकला जातो. लवंग घालून विड्याचं पान खाल्ल्यास अन्न पचायला मदत होते.


## शोधाशोध २९५

शोधाशोध या शब्दकोड्यामधील चौकोनातील अक्षरांमध्ये दडलेले खालील शब्द शोधा.

१) कलाकार
२) उपासना
३) माध्यमे
४) स्वाभिमान
५) हेतू
६) धबधबा
७) शब्दरचना
८) वीजमंत्री
९) परिचारिका
१०) वैद्यकीय

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | वी | क | ण | स | रा | ख | च | स्वा | उ |
| ध | ज | ओ | वै | र | ण | च | त | भि | पा |
| ब | मं | का | द्य | प्र | ति | थ | य | मा | स |
| ध | त्री | रा | की | चां | ग | भ | लं | न | ना |
| बा | र | स | य | ति | प | यो | व | मं | द |
| पा | क | न | त्र | थी | क्ष | श | र्ज्य | प | पी |
| न | क | यं | मा | ग | मं | ब्द | ग | रि | र |
| क्ष | ला | चं | ध्य | चं | प्र | र | प्र | चा | प्र |
| त्र | का | च | मे | हे | चं | च | मा | रि | कां |
| द | र | ल | ळ | तू | ड | ना | द | का | ड |

चित्र : अतुल बेलोकर




# 'चित्रांगण'!

'चित्रांगण'मध्ये सहभागी व्हायचंय? मग ते तर खूपच सोपं आहे. तुमच्या मुलांनी काढलेलं चित्र (ए-४ साइजमध्ये) त्यांच्या फोटोसह पाठवा. त्यासोबतच मुलाचं नाव, वय, इयत्ता आणि शाळेचं नाव ही माहितीदेखील पाठवा. निवडक चित्रांना 'चित्रांगण'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल. चित्र आणि माहिती आम्हाला features@civicmirror.in या मेलवर पाठवा.

## 'चित्रांगण'!




**इपासा महाजन,** १४ वर्षे, डीपीएस स्कूल



**युविक महाजन,** ५ वर्षे, जिंगलकिड्ज स्कूल, बालेवाडी



**लिआने लोबो,** ८ वर्षे, क्रूट मेमोरियल स्कूल, वानवडी



**पियाली दत्ता,** १० वर्षे, एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूल, रहाटणी

# तुमचं आजचं भविष्य काय?

### मेष
तुमच्या विनोदबुद्धीमुळे अनेक प्रश्न मार्गी लागतील आणि तणावदेखील निवळेल. त्यामुळे हलकेफुलके विनोद करून सर्वांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करा.

### वृषभ
पूर्वी घाईगडबडीत घेतलेला एखादा निर्णय बदलण्याची संधी तुम्हाला आज मिळणार आहे. त्यामुळे विचारपूर्वक निर्णय घ्या. काही वाईट सवयी सोडून चांगलं वागण्याचा प्रयत्न करा. आजूबाजूच्या लोकांवर विश्वास ठेवा.

### मिथून
भूतकाळातील एखादी घटना आज पुन्हा एकदा डोके वर काढण्याची शक्यता आहे. मात्र, असे काही घडल्यास तुम्ही ताण घेऊ नका. घडणाऱ्या घटनांना धैर्याने सामोरे जा. प्रकृतीच्या तक्रारी टाळण्यासाठी नियमित व्यायाम करा.

### कर्क
तुम्ही पुढाकार घेतल्याने अनेक गोष्टी सोप्या होतील. त्यामुळे तशी संधी मिळाल्यास अवश्य पुढाकार घ्या. तुमच्या वर्तणुकीचे आजूबाजूच्या लोकांवर सकारात्मक परिणाम होतील.

### सिंह
आजचा दिवस प्रसन्नदायी असेल. तुमच्या आवडीची कामे वेगाने पूर्ण करा. गतिमान व्हा. कामे रेंगाळत ठेवू नका. वेगात कामे पूर्ण करताना गोंधळ निर्माण होईल, असे काही करू नका.

### कन्या
नातेसंबंधांकडे अधिक लक्ष द्या. कोणत्याही नात्यात तणाव निर्माण होणार नाही, याची काळजी घ्या. योग्य त्या व्यक्तिप्रती कृतज्ञता दाखवा. गरज भासल्यास विश्रांती घेऊन नव्या दमाने कामाला लागा.

### तूळ
तुमच्या कामांची गति वाढणे आवश्यक आहे. त्यामध्ये येणारे सर्व अडथळे पार करण्यावर भर द्या. आहारवर लक्ष केंद्रित करा, अन्यथा प्रकृतीच्या तक्रारी उद्‌भवू शकतात.

### वृश्चिक
कार्यावर भर देऊन स्वतःचं ध्येय प्राप्त करण्यासाठी अधिक कठोर व्हा. ध्येयप्राप्तीपर्यंत न थांबणं हेच तुमच्यासाठी योग्य ठरेल. प्रथिने आणि खनिजे यांचं प्रमाण जास्त असलेले पदार्थ आहारात समाविष्ट करा.

### धनू
चांगल्या सवयी कधीही सोडू नका. कदाचित काही सवयींना लोक विरोध करतील. मात्र, तुम्ही ठाम राहा. नशीब तुम्हाला साथ देत आहे. त्यामुळे कोणतीही गोष्ट विचारपूर्वक करा आणि योग्य संधीचा लाभ घ्या.

### मकर
तुमचे मनोबल वाढवणारा दिवस आहे. ग्रहदशा देखील उत्तम आहे. त्यामुळे महत्त्वाची कामे आज पूर्ण करा. आजूबाजूच्या लोकांना तुमच्या कल्पना सांगा आणि त्यांना त्यासाठी अनुकुलता करून घ्या.

### कुंभ
काही संवेदनशील घटना तुमच्या आजूबाजूला घडतील. त्यावेळी सावध राहा. भावनेच्या आहारी न जाता योग्य निर्णय घ्या. तुम्हाला स्वतःच्या कामातूनच अधिक ऊर्जा मिळेल. त्यामुळे कार्यरत राहा.

### मीन
आजचा दिवस उत्साही असेल. कंटाळा झटकून कामाला लागा. रखडलेली कामे पूर्ण करा. कोणत्याही विचारात अडकू नका. नकारात्मक गोष्टींपासून दूर राहा.

**Volume No 2, Issue 128**, RNI N0. MAHMUL03832 Published by Mr Amol Lokhande for Lexicon Broadcasting LLP at S No 46/5, Aganagar Cooperative Housing Society Limited, Pune 411014 and printed at Lokmat Media Pvt Ltd. 34/A Vadgaon Khurd, Sinhgad Road, Pune 411041. Resident Editor (Pune Market): Vinita Deshmukh, Responsible for selection of news under PRB Act. © All rights reserved. Reproduction of whole or in part without written permission is prohibited.”

# आशिया चषक यूएईत घ्या

## पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने दिला नवा प्रस्ताव; नाकारल्यास स्पर्धेतून माघार घेण्याची धमकी

#दुबई

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) आशिया क्रिकेट परिषदेला (एसीसी) एक नवीन प्रस्ताव दिला आहे. यानुसार, भारत पाकिस्तानमध्ये खेळण्यास तयार नसल्यास आशिया चषक स्पर्धा संयुक्त अरब अमिरातमध्ये आयोजित करण्यात पीसीबी तयार आहे.

पीसीबीचे प्रमुख नज्म सेठी यांनी दुबईत आशिया क्रिकेट परिषदेच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि आपले म्हणणे मांडले. आशिया चषक श्रीलंकेत आयोजित करण्याच्या प्रस्तावावरही त्यांनी आक्षेप घेतला. त्याचवेळी त्यांनी आपला नवा प्रस्ताव नाकारल्यास आशिया चषकातून माघार घेण्याची धमकीही त्यांनी दिली. यंदा आशिया चषकाचे यजमानपद पाकिस्तानकडे असून २ ते १७ सप्टेंबरदरम्यान ही स्पर्धा होणार आहे.

पीसीबीची नवीन प्रस्ताव आशिया क्रिकेट परिषद नाकारणार नाही, असा विश्वास व्यक्त करून सेठी म्हणाले, "२०१८ आणि २०२२ मध्ये आशिया चषक युएईमध्ये झाला. यावेळीही ही स्पर्धा यूएईमध्ये आयोजित केली जाऊ शकते." सेठी यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) सप्टेंबरमध्ये यूएईतील जास्त उष्णतेबद्दलची चिंता फेटाळून लावली. ते म्हणाले, बीसीसीआयने २०२० मध्ये सप्टेंबर आणि नोव्हेंबर महिन्यातदेखील यूएईत आयपीएल सामने आयोजित केले होते.



पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख नज्म सेठी

दुबईला जाण्यापूर्वी सेठी यांनी पीसीबीच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत सांगितले होते की, जर आशिया चषकाचे यजमानपद पाकिस्तानकडून काढून घेण्यात आले तर पाकिस्तान आशिया चषकावर बहिष्कार टाकेल. अशा परिस्थितीत त्यावेळच्या रिकाम्या चौकटीत तीन-चार देशांच्या स्पर्धा आयोजित करण्याचे काम सुरु करा. यापूर्वी असे वृत्त आले होते की, एसीसी सदस्य देशांनी पाकिस्तानच्या हायब्रीड मॉडेलचा म्हणजेच भारताचे सामने पाकिस्तानबाहेर हलवण्याचा प्रस्ताव नाकारला होता. त्याचबरोबर सदस्य देशांना आशिया चषक पाकिस्तानमधून बाहेर काढायचा आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, बांगलादेश आणि श्रीलंकेने यावेळी आशिया कप आयोजित करण्याचा प्रस्ताव दिला होता. श्रीलंकेचा दावा मजबूत मानला जात होता. मात्र, एसीसीकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.




### पाकने दिली विश्वचषकात न खेळण्याची धमकी

पाकिस्तान क्रिकेट बोर्डानेही वर्ल्डकप न खेळण्याची धमकी दिली आहे. एकदिवसीय विश्वचषक या वर्षी ऑक्टोबरमध्ये भारतात होणार आहे. भारत आशिया चषक खेळायला आला नाही तर भारतात खेळायलाही जाणार नाही, अशी धमकीही पीसीबी देत आहे. तसेच, पाकिस्तानने आयसीसीला त्यांचे सामने विश्वचषकातून बाहेर काढण्याची विनंती केली आहे.

आयसीसी कॅलेंडरमध्ये २०२३ मध्ये होणारा आशिया कप पाकिस्तानला देण्यात आला होता. कॅलेंडर प्रसिद्ध होताच भारतीय संघ पाकिस्तानात खेळण्यासाठी जाणार नसल्याचे बीसीसीआयने स्पष्ट केले होते. बीसीसीआयने आशिया चषक तटस्थ ठिकाणी आयोजित करण्याची मागणी केली होती, परंतु पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने ते मान्य केले नाही. कारण आशिया चषक केवळ आपली ढासळलेली आर्थिक स्थिती सुधारेल अशी अपेक्षा करत आहे. मात्र, पाकिस्तानने ही स्पर्धा हायब्रीड मॉडेलवर आयोजित करण्याचा प्रस्तावही ठेवला होता. त्यानुसार भारताचे सामने बाहेर हलवले जातील. या स्पर्धेतील उर्वरित सामने पाकिस्तानमध्ये होणार आहेत. भारत फायनलमध्ये पोहोचला तर फायनलही पाकिस्तानच्या बाहेर असेल.

आशिया कपमध्ये भारत, पाकिस्तान, नेपाळ, अफगाणिस्तान, बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळ सहभागी होणार आहेत. भारत, पाकिस्तान, नेपाळ हे एकाच गटात आहेत. नेपाळ प्रथमच यासाठी पात्र ठरला आहे. अफगाणिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका दुसऱ्या गटात आहेत. **वृत्तसंस्था**

### श्रीलंकेने यजमानपदाची ऑफर दिल्याने सेठींना धक्का

श्रीलंकेच्या बोर्डाने बीसीसीआयच्या सहकार्याने आशिया चषक आयोजित करण्याची ऑफर दिल्याने सेठी आश्चर्यचकित झाले आहेत. फेब्रुवारीमध्ये झालेल्या एसीसीच्या शेवटच्या बैठकीत बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानने यावर्षी आशिया चषक आयोजित करण्याचा श्रीलंकेचा प्रस्ताव फेटाळला होता. पाकिस्तान यजमानपद कायम ठेवणार यावर गेल्या बैठकीत एकमत झाले होते.

# 'सनी'ने सांगितले 'सूर्या'चे सीक्रेट



#मुंबई



आयपीएलमध्ये सध्या समालोचकाच्या भूमिकेत असलेले भारताचे महान फलंदाज आणि माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी सूर्यकुमार सादवच्या यशाचे रहस्य उलगडून सांगितले आहे.

सूर्यकुमार यादवने रॉयल चॅलेंजर्स बंगलोरविरुद्धच्या महत्वपूर्ण सामन्यात ३५ चेंडूत ८३ धावांची वादळी खेळी केली. त्याच्या या जबरदस्त बॅटिंगचे रहस्य सुनील गावस्कर यांनी उलगडून सांगितले. ते म्हणाले, या क्रिकेटपटूचा अंदाज गल्ली क्रिकेटसारखा वाटतो. सूर्यकुमार यादवने आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगलोरविरुद्ध ज्या पद्धतीची बॅटिंग केली, ते पाहून तो गल्ली क्रिकेट खेळतोय, असं वाटलं. गल्लीत खेळत असल्यासारखे अगदी सहजपणे त्यानं बंगलोरच्या गोलंदाजांची धुलाई केली. "

सूर्यकुमार यादवने बंगलोरविरुद्ध ३५ चेंडूत ८३ धावा फटकावताना ६ षटकार आणि ७ चौकार लगावले. या दरम्यान त्याने मैदानाच्या चौफेर फटकेबाजी केली. मोकळेपणाने आपलं कौशल्य दाखवलं. यामुळे मुंबईने २०० धावांचे टार्गेट २१ चेंडू राखून आरामात पार केलं. "सूर्या गोलंदाजांना आपल्या इशाऱ्यावर नाचवत होता. त्याची फलंदाजी पाहून गल्ली क्रिकेटची आठवण आली. सतत अभ्यास आणि कठोर मेहनतीमुळे त्याच्या खेळात सुधारणा झाली आहे," असं सुनील गावस्कर म्हणाले.

"बॅटच्या ग्रीपवर सूर्याचा खाली राहणारा हात मजबूत आहे. त्याचा तो खूप चांगल्या पद्धतीने उपयोग करतो. आरसीबीविरुद्ध सूर्याने आधी लॉग ऑन आणि लॉग ऑफला शॉट मारले. त्यानंतर मैदानाच्या चौफेर फटकेबाजी केली," असेही गावसकर यांनी नमूद केले. सूर्यकुमार यादवची शानदार बॅटिंग पाहून नॉन स्ट्राइक एन्डवर उभ्या असलेल्या नेहाल वढेराचा आत्मविश्वास वाढला. त्याने ३४ चेंडूत नाबाद ५२ धावा फटकावल्या. सूर्या आणि वढेराने 140 धावांची भागीदारी करुन मुंबईचा विजय सुनिश्चित केला.

"जेव्हा तुम्ही सूर्यकुमार यादवसोबत बॅटिंग करता, तेव्हा तुमचा आत्मविश्वास वाढवतो. नेहाल वढेराच्या इनिंगच वैशिष्ट्य म्हणजे त्याने सूर्यकुमारसारखे शॉट मारण्याचा प्रयत्न केला नाही. त्याची चांगली बाब म्हणजे, त्याने संतुलन ठेवण्याचा प्रयत्न केला" असं सुनील गावस्कर म्हणाले. **वृत्तसंस्था**

# विश्वचषकात भारत-पाक लढत १५ ऑक्टोबरला?

## बीसीसीआयला हवा अहमदाबादेत सामना, पाकिस्तानचा नकार

#दुबई



एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात १५ ऑक्टोबरला सामना होण्याची शक्यता आहे. आयसीसीने अद्याप विश्वचषकाचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केलेले नाही.

या विश्वचषकाचे यजमानपद भारताला मिळाले आहे. ही स्पर्धा ५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबरदरम्यान खेळवली जाणार आहे. बीसीसीआयमधील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हवाल्याने एका क्रिकेटविषयक संकेतस्थळाने दिलेल्या वृत्तानुसार, भारत-पाकिस्तान सामना १५ ऑक्टोबरला होऊ शकतो. मात्र, दोन्ही देशांच्या क्रिकेट बोर्डांमध्ये सामन्याच्या मैदानावर एकमत झालेले नाही. हा सामना अहमदाबादमध्ये व्हावा, अशी बीसीसीआय आणि आयसीसीची इच्छा आहे, पण पाकिस्तान क्रिकेट बोर्ड त्यासाठी तयार नाही.

विश्वचषकाचा पहिला सामना इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाऊ शकतो. गेल्या विश्वचषकात इंग्लंड विजेता होता आणि न्यूझीलंड उपविजेता होता. भारत आपला पहिला सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध चेन्नईमध्ये खेळू शकतो. त्याची तारीख अजून ठरलेली नाही. पाकिस्तानविरुद्धचा सामना १५ ऑक्टोबरला म्हणजेच रविवारी होऊ शकतो. याच दिवशी पाकिस्तानी संघाचा कर्णधार बाबर आझमचा वाढदिवस आहे. जेतेपदाचा सामना १९ नोव्हेंबरला रंगणार आहे.

विश्वचषकासाठी १२ ठिकाणे निवडण्यात आली आहेत. यामध्ये चेन्नई आणि कोलकाताचाही समावेश आहे. अहमदाबाद, लखनऊ, मुंबई, राजकोट, बंगळुरु, दिल्ली, इंदूर, गुवाहाटी, हैदराबाद आणि धर्मशाळा ही उर्वरित १० ठिकाणे आहेत.

भारतात खेळल्या जाणाऱ्या वनडे वर्ल्ड कपसाठी पात्र ठरणारा दक्षिण आफ्रिका आठवा संघ ठरला आहे. चार वर्षे जुन्या आयसीसी सुपर लीगच्या गुणतालिकेत आठव्या स्थानावर आफ्रिकन संघ थेट विश्वचषकासाठी पात्र ठरला आहे.२०२० ते मे २०२३ या कालावधीत भारत, पाकिस्तान, न्यूझीलंड, बांगलादेश, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, अफगाणिस्तान, आयर्लंड, झिम्बाब्वे, नेदरलँड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज या १३ देशांनी सुपर लीगमध्ये सामने खेळले. यापैकी ८ संघ विश्वचषकासाठी थेट पात्र ठरले आहेत. **वृत्तसंस्था**